पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई ● वर्ष: 7 ● अंक: 12 ● 16 जून 2025 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.




# सेवा, सुशासन, गरीब कल्याणाची

# 11 वर्षे




## अध्यक्षीय मनोगत

# सामर्थ्य, समृद्धी, सन्मान

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर यशस्वी करून पाकिस्तानला अद्दल घडवली. पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यात ज्या महिलांचे कुंकू पुसले गेले होते त्यांना न्याय मिळवून दिला. याआधी एकदा सर्जिकल स्ट्राईक करून आणि एकदा एअर स्ट्राईक करून भारताने पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादावर कारवाई केली होती. पाकिस्तानला धडा शिकवतानाच भारतीय सैन्याने चीनच्या आक्रमकतेला सडेतोड उत्तर देऊन पूर्व लद्दाखमध्ये माघार घेण्यास भाग पाडले. गेल्या अकरा वर्षात मोदीजींच्या नेतृत्वात केंद्र सरकारने भारताला सामर्थ्यवान करण्यासाठी अफाट प्रयत्न केले. हे प्रयत्न यशस्वी झाले. म्हणूनच भारताच्या शत्रूंना धडा शिकविला आणि देशाची ताकद दाखवून दिली. मोदीजींच्या नेतृत्वात भारत जागतिक पातळीवर एक प्रमुख लष्करी ताकद म्हणून उदयाला आला आहे. देशाला सामर्थ्यवान बनवितानाच गेल्या अकरा वर्षात मोदीजींनी देशाला समृद्ध करण्यासाठी दमदार पावले टाकली. भारताची अर्थव्यवस्था २०१४ ते २०२५ या कालावधीत अकराव्या स्थानावरून चौथ्या स्थानावर आली. मोदीजींनी भारताची अर्थव्यवस्था पाच ट्रिलिअन डॉलर्सची करून देशाला जगात तिसऱ्या स्थानावर नेण्याचा निर्धार केला आहे. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या टर्ममध्ये हा निर्धार यशस्वी होईल. देशाची अर्थव्यवस्था विस्तारली तसे देशातील सामान्य माणसाचे उत्पन्नही वाढले. जनधन योजनेच्या माध्यमातून देशातील प्रत्येकाचे बँकेत खाते उघडले गेले आणि त्यात बचतही होऊ लागली. देशातील बड्या उद्योगांनी जागतिक पातळीवर ठसा उमटवला त्याच वेळी देशातील सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांची सरकारच्या प्रोत्साहनामुळे भरभराट झाली. असंख्य स्टार्टअप्सच्या माध्यमातून युवक युवतींनी यशस्वी व्यवसाय करतानाच इतरांना रोजगार दिले. भारतातील लोकांचे गेल्या अकरा वर्षातील उंचावलेले जीवनमान मोदीजींच्या यशस्वी आर्थिक धोरणांची साक्ष देते. देशाला सामर्थ्यशाली आणि समृद्ध बनविण्यासाठी प्रयत्न करतानाच मोदीजींनी सातत्याने सर्वसामान्य भारतीयांना सन्मानाने जगता यावे यासाठी काम केले. प्रत्येकाला घर मिळावे, घरात शौचालयाची सुविधा असावी, नळावाटे स्वच्छ पाणी मिळावे, विजेचे कनेक्शन असावे, स्वस्तात इंटरनेट मिळावे आणि परवडणारी आरोग्य सुविधा मिळावी यासाठी मोदीजींनी ऐतिहासिक कार्य केले आहे. सामान्य माणसाला सन्मानाने जगता यावे यासाठी त्याला मुलभूत सुविधा मिळाल्याच पाहिजेत असा मोदीजींचा आग्रह जाणवतो. आपण देशाचे पंतप्रधान नव्हे तर प्रधान सेवक आहोत, असे मोदी म्हणतात आणि त्यांच्या या विचाराची प्रचिती त्यांच्या प्रत्येक कृतीतून येते. त्यांनी त्यांचे आयुष्य गरीबांच्या, महिलांच्या, वंचितांच्या, दलितांच्या आणि मागासांच्या सेवेसाठी समर्पित केले आहे. जनसामान्यांच्या सन्मानासाठी ठाम उभ्या राहणाऱ्या मोदीजींनी अयोध्या येथे श्रीराम मंदिर साकारून कोट्यवधी हिंदूंचे स्वप्न साकारले. देशाच्या सन्मानाचा हा विषय आहे. देशाच्या सामर्थ्यासाठी, समृद्धीसाठी आणि सन्मानासाठी प्रत्येक क्षण झटणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या तिसऱ्या टर्ममधील पहिले वर्ष नुकतेच पूर्ण झाले. मोदीजींचे हार्दिक अभिनंदन! पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताला विकसित देश करण्याच्या अभियानात काम करता येते हे माझ्यासारख्या असंख्य भाजपा कार्यकर्त्यांचे भाग्य आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

मोदी सरकारची कामगिरी सुवर्णाक्षराने नोंदवावी लागेल ०४



सुरक्षित भारत ०७



मोदी युगातील दिमाखदार नवा भारत! १०



'कसलं डिजिटल...?' २१




जनतेने ज्यांना नाकारले, ते जनादेशाला नाकारतात! २५



पक्षभेदा पलिकडची व्यापक राष्ट्रनिती २७



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# मोदी सरकारची कामगिरी सुवर्णाक्षराने नोंदवावी लागेल

● जे.पी.नड्डा, राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय आरोग्य मंत्री

> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ११ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. ही ११ वर्षे गरीब कल्याण, सुशासन आणि जनतेची सेवा या संकल्पनांना समर्पित आहेत. या ११ वर्षात सामान्य जनतेने कार्यक्षम सरकार कसे असते, याचा पुरेपुर अनुभव घेतला आहे. मतदारांना जबाबदार असणारे सरकार कसे असते हेही मोदी सरकारने गेल्या ११ वर्षात दाखवून दिले आहे.



**देशाची** सीमा म्हणजेच राष्ट्र सुरक्षा बळकट करतानाच मोदी सरकारने देशाची अर्थव्यवस्था जगातील ५ व्या क्रमांकाची बनवली आहे. जागतिक पातळीवर भारताचा बहुमान वाढवणारी ही ११ वर्षे सर्वसामान्य भारतीयांच्या कल्याणासाठी संपूर्णपणे झटणारी ठरली. मोदी सरकारची वेगवेगळ्या क्षेत्रातील गौरवपूर्ण कामगिरी देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने नोंद करावी, अशीच आहे. मोदी सरकारने गेल्या ११ वर्षात देशातील राजकीय संस्कृती पूर्णपणे बदलून टाकली आहे. २०१४ पूर्वी सलग १० वर्षे सत्तेत असणाऱ्या काँग्रेस सरकारने लांगुलचालनाचा कळस गाठला होता. सत्तेसाठी समाजात फुट पाडणे हा काँग्रेसच्या काळातील राज्य कारभाराचा विशेष गुण होता. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान झाल्यानंतर अनुनयाचे (पॉलिटिक्स ऑफ अपीझमेंट) राजकारण पूर्णपणे बंद केले. जनतेच्या सेवेसाठी आपण सत्तेत आहोत, ही भावना सतत मनात ठेवत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी गोरगरीब आणि वंचित जनतेच्या कल्याणासाठी अनेक योजना सुरू केल्या. जनतेने आपल्याला निवडून देऊन सत्तेची जबाबदारी सोपविली आहे. त्यामुळे आपण जनतेला आपल्या कामाचा हिशोब देण्यास बांधील आहोत, हेही मोदी सरकारने गेल्या ११ वर्षात वारंवार दाखवून दिले आहे. आपण केलेल्या कामाचा हिशोब मोदी सरकारकडून सातत्याने जनतेपुढे ठेवला जातो. आपले सरकार आपल्यासाठी काय करते आहे, हे जाणून घेण्याचा अधिकार जनतेला आहे. म्हणूनच दस्तुरखुद्द नरेंद्र मोदी हे आपल्या सरकारचे प्रगती पुस्तक जनतेपुढे विविध माध्यमातून ठेवत असतात. 'मन की बात', लाभार्थी संवाद यासारख्या उपक्रमातून पंतप्रधान मोदी हे जनतेशी संवाद साधत असतात. देशाच्या आर्थिक वाढीसाठी गेल्या ११ वर्षात अनेक निर्णय घेतले गेले. त्यामुळे जगात ११ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेला आपला देश आता ५ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे. संपूर्णपणे पारदर्शक कारभार करून मोदी सरकारने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. मोदी सरकारच्या ११ वर्षाच्या कार्यकाळाचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे जनतेचा सहभाग. जनतेने पंतप्रधांच्या प्रत्येक आवाहनाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आहे.




पारदर्शक कारभाराबरोबरच मोदी सरकारने देशात वित्तीय शिस्तही आणली. डीबीटी प्रणालीचा वापर करत सरकारी निधीची गळती थांबवली. लाभार्थ्यांपर्यंत सरकारी योजनांचे अर्थसहाय्य थेट पोहचवत, मध्यस्थ यंत्रणेकडून कोणाला भ्रष्टाचारही थांबवला. २००४ ते २०१४ या काळात काँग्रेसचे सरकार असताना अनेक घोटाळे घडले. मोदी सरकारच्या काळात भ्रष्टाचाराला पूर्णपणे आळा घालण्यात आला आहे. त्यामुळेच आपल्या देशाची वाटचाल आता 'विकसित भारता'कडे सुरू आहे. अनेक अशक्य गोष्टी मोदी सरकारने करून दाखवल्यामुळे, 'मोदी है तो मुमकीन है' अशी जनसामन्यांची भावना तयार झाली आहे. कोरोनासारख्या संकटाच्या काळात पंतप्रधान मोदी यांनी सामान्य माणसाला विश्वासात घेतले. त्यामुळेच अन्य देशांच्या तुलनेत भारतातील बळींची संख्या खूपच कमी होती. युद्ध, नैसर्गिक आपत्ती यासारख्या संकटात अडकलेल्या हजारो भारतीयांना मोदी सरकारने मायदेशी सुखरूपरित्या आणले आहे.

काश्मीरमधील ३७० वे कलम कधीच रद्द होऊ शकणार नाही, असे अनेकांचे ठाम मत होते. मोदी सरकारने हे कलम रद्द करत काश्मीरला खऱ्या अर्थाने भारताच्या मुख्य प्रवाहात आणले. मागील वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत जम्मू-काश्मीरमध्ये सुमारे ५९ टक्के मतदान झाले. त्यानंतर झालेल्या जम्मू-काश्मीर विधानसभेच्या निवडणुकीत ६३ टक्क्यांहून अधिक मतदान झाले. काश्मीरची जनता आता अतिरेक्याच्या धमक्यांना घाबरत नाही, हेच जम्मू-काश्मीरच्या सामान्य जनतेने दाखवून दिले. मोदी सरकारच्या धाडसी निर्णयामुळे काश्मीरमधील दहशतवादी संघटनांना चाप बसला. तिहेरी तलाकसारखी अमानुष प्रथा रद्द करून मोदी सरकारने मुस्लिम महिलांची छळवणुकीपासून मुक्तता केली. तिहेरी तलाकसारखी प्रथा मुस्लिम महिलांचा अतोनात छळ करणारी होती. हे माहित असूनसुद्धा अनेक राजकीय मंडळींनी, विचारवंतांनी, पत्रकारांनी या प्रथेविरुद्ध कधीच आवाज उठवला नाही. बांगलादेश, पाकिस्तान, अफगाणिस्तान, सिरीया, इराण, इराक, मलेशिया या मुस्लिम राष्ट्रांतही तिहेरी तलाक प्रथा अस्तित्वात नाही. भारतात मात्र ही प्रथा अनेक वर्षे चालू होती. मोदी सरकारने ही प्रथा बंद करण्याचा धाडसी निर्णय घेतला. याच पद्धतीने मोदी सरकारने वक्फ कायद्यात सुधारणा करण्याचाही निर्णय घेतला. पाकिस्तान, बांगलादेश, अफगाणिस्तान या देशातील हिंदू नागरिकांनी




छळामुळे देश सोडला तर त्यांना भारतीय नागरिकत्व देण्याचा ऐतिहासिक निर्णय मोदी सरकारने घेतला. त्यासाठी नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) मोदी सरकारने तयार केला. यासारख्या अनेक मुद्यांवरून मोदी सरकार आणि भारतीय जनता पार्टीविरुद्ध खोट्या-नाट्या गोष्टी पसरवल्या गेल्या. जनतेला भ्रमित करण्याचा पुरेपुर प्रयत्न काही शक्तींनी गेल्या ११ वर्षात केला आहे.

नारी शक्ती सक्षमीकरणासाठी मोदी सरकारने अनेक निर्णय घेतले आहेत. यापैकी एक निर्णय म्हणजे महिलांना संसद आणि विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षण देणे. संसद आणि विधानसभांमध्ये महिलांना आरक्षण देण्याचा मुद्दा अनेक वर्षे लोंबकळत पडला होता. २००४ ते २०१४ अशी सलग १० वर्षे सत्तेत असलेल्या काँग्रेसने महिला आरक्षणाचा मुद्दा तडीला नेण्याचे धाडस दाखवले नव्हते. या आरक्षणाला विरोध करणाऱ्या शक्तींपुढे काँग्रेसने अनेकदा गुडघे टेकले होते. मोदी सरकारने महिलांचे आरक्षण मंजूर करत नारी शक्ती विषयीची आपली बांधिलकी कृतीतून दाखवून दिली. महिलांना सैनिकी शाळांमध्ये प्रवेश, संरक्षण दलात महिलांना संधी अशी मोदी सरकारची नारी शक्ती सक्षमीकरणाची अनेक कामे आहेत. ७३ सैनिकी शाळांमध्ये मुलींना प्रवेश दिला जात आहे. लखपती दीदीसारख्या योजनेतून ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनवले जात आहे. मुद्रासारख्या योजनेतून अनुसूचित जाती-जमाती आणि अन्य मागास वर्गीय समाजातील महिला उद्योजकांना प्राधान्याने कर्जपुरवठा केला जात आहे. मातृ वंदना योजनेंतर्गत गर्भवती महिलांना अर्थसहाय्य देणे, बाळंतपणाची रजा २६ आठवड्यापर्यंत वाढवणे यासारखे निर्णय मोदी सरकारने घेतले. काही वर्षापूर्वीपर्यंत भारताची अर्थव्यवस्था अशक्त म्हणून ओळखली जात होती. गेल्या ११ वर्षात मोदी सरकारने हे चित्र पार बदलून टाकले. त्यामुळे आता भारताची वाटचाल जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याकडे सुरू आहे.

वस्तू आणि सेवा कर प्रत्यक्षात आणून अर्थव्यवस्था पारदर्शक बनवणाऱ्या मोदी सरकारने २०१६ मध्ये नोटबंदीचा ऐतिहासिक निर्णय घेतला. यामुळे अर्थव्यवस्थेत पारदर्शकता आली. जीएसटीद्वारे होणारे कर संकलन २ लाख कोटींपेक्षा अधिक होऊ लागले आहेत. परकीय चलनाच्या गंगाजळीत (फॉरेक्स रिझर्व्ह) सातत्याने वाढ होत आहे. गेल्या ११ वर्षात प्रत्यक्ष कर संकलनात (डायरेक्ट टॅक्स) २३८ टक्के वाढ झाली आहे. परकीय चलन साठ्यात १३५ टक्के तर करदात्यांच्या संख्येत १३७ टक्के वाढ झाली आहे. देशाची निर्यात ८२५ बिलियन डॉलर्सवर गेली आहे. ■

# सुरक्षित भारत



● शिवप्रकाश

> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला ११ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे देशभर 'संकल्पातून सिद्धीकडे' (संकल्प से सिद्धी) अभियान सुरू आहे. गरीब कल्याण, पायाभूत सुविधांचा विकास अंतर्गत सुरक्षा, आर्थिक प्रगती, सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी केलेले प्रयत्न, डिजिटल क्रांती अशा विविध मुद्यांवर मोदी सरकारने केलेल्या कामाची माहिती या अभियानात देण्यात येत आहे.

**गेल्या** ११ वर्षात देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने मोदी सरकारने केलेले काम अभूतपूर्व असे आहे. **'शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्र चिंता प्रवर्तते'**, असे चाणक्यनिती सांगते. याचा अर्थ राष्ट्र सुरक्षित असेल तरच सर्व प्रकारच्या शास्त्रांची चर्चा करता येईल. कोणत्याही देशाला अंतर्गत आणि बाह्य अशा दोन्ही शत्रूंपासून धोका असतो. हा धाका लक्षात घेऊन शासकाने, राज्यकर्त्याने देशाच्या संरक्षणासाठी जे-जे आवश्यक आहेत ते करणे अपेक्षित असते. चाणक्य नितीतील हा उपदेश पक्का ध्यानात ठेऊन मोदी सरकारने गेल्या ११ वर्षात 'सुरक्षित भारत' संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने वाटचाल केली आहे. व्यवहारात दुर्बळाच्या शांतीच्या उपदेशाला काहीच महत्व नसते. शक्तीवानाच्या शांतीच्या संकल्पाला व्यावहारिक अधिष्ठान असते. त्यामुळे अनेक विचारवंत शक्तीला, बळाला शांतीचा आधार मानतात. **राष्ट्रकवी रामधारी सिंह दिनकर यांनी 'क्षमा शोभती उस भुजंग को जिसके पास गरल हो'** या कवितेत हाच संदेश उद्धृत केला आहे. शक्तीशाली विराला क्षमा देणे, माफी देणे शोभते, असा या कवितेचा भावार्थ आहे. भारतीय जनता पार्टीने आणि त्याआधी जनसंघानेही देशाच्या सामर्थ्याला, शस्त्रसज्जतेला मोठे महत्व दिले आहे. जनसंघाच्या १९६४ मध्ये पाटणा येथे झालेल्या अधिवेशनात देशाच्या सुरक्षेसाठी अणुबॉम्ब बनवण्याची मागणी करण्यात आली होती. त्या अधिवेशनात यासंदर्भातील प्रस्तावात आपल्या धर्मातील सर्व देव-देवता धर्म रक्षणासाठी शस्त्रधारी होते, याचे स्मरण करून देण्यात आले होते. १९९८ मध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे



सरकार केंद्रात स्थापन झाल्यावर अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने पोखरण अणुचाचणी करत जगाला आपल्या सामर्थ्याचे दर्शन घडविले होते. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेत आल्यानंतर देशाच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले. कोणताही प्रकारचा दहशतवाद कदापि सहन केला जाणार नाही (झिरो टॉलरन्स) हे कृतीने दाखविल्यामुळे दहशतवाद्यांना आणि त्यांच्या पाठिराख्यांना जरब बसली. काँग्रेस सरकार सत्तेत असताना दहशतवाद मोडून काढण्याचे प्रयत्न कधीच झाले नाहीत. त्यामुळे २००४ ते २०१४ या काळात देशात दहशतवाद्यांनी अनेक बॉम्बस्फोट घडवून आणले, मुंबईवर हल्ला चढविला. आपण काही केले तरी काँग्रेस सरकार शांत राहणार, याची अतिरेक्यांना खात्री होती. २०१४ नंतर परिस्थिती आमूलाग्र बदलली आहे. २०१६ आणि २०१९ मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यांना सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईक करून खणखणीत उत्तर दिले गेले होते. दहशतवाद्यांना आणि देशाच्या शत्रूला उत्तर देण्यासाठी मोदी सरकारने लष्कराला संपूर्ण स्वातंत्र्य दिले आहे.

मोदी सरकारने देशाला सुरक्षित बनवण्यासाठी घेतलेल्या निर्णयांचा आढावा घेऊ. २०१३-१४ मध्ये संरक्षण खात्यासाठीची केंद्रीय अर्थसंकल्पातील तरतूद होती २.५३ लाख कोटी रुपये. २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात संरक्षण खात्यासाठीची तरतूद ६.८१ लाख कोटी रुपये इतकी आहे. याचा अर्थ संरक्षण खात्यासाठीची तरतूद तीन पटीने वाढवली आहे. सैनिकांना उच्च गुणवत्तेचे भारतात बनविलेले बुलेट प्रूफ जॅकेट, उत्तम दर्जाचे हेल्मेट, नवे बॅटललेस युनिफॉर्म, रात्रीच्या वेळेत वापरायची उपकरणे (नाईट व्हिजन डिव्हाईस), थर्मल इमेजर यासारख्या अत्यावश्यक सुविधांची उपलब्धता करून देण्यात आली आहे. सैन्यदलातील समन्वयासाठी तिन्ही संरक्षण दलाचा प्रमुख (सीडीएस) हे पण निर्माण करण्यात आले. 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी तिन्ही दलातील समन्वय किती परिणामकारक ठरतो हे दिसले आहे. लढाऊ विमानांसकट शस्त्रास्त्र खरेदीचे निर्णय तातडीने घेतले जात आहेत. फ्रान्सकडून केलेली राफेल विमानांची खरेदी, एस-४०० क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली, सुखोई-३० विमाने, हॅमर मिसाईल, इस्त्राईलकडून ड्रोन, चिनुक हेलिकॉप्टर, तेजस लढाऊ विमान (पूर्णपणे स्वदेशी), वरुणास्त्र अशा विविध आयुधांनी भारतीय सेना सशक्त बनली आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये निर्धारीत लक्ष्यावर अचूकपणे मारा करणारी क्षेपणास्त्रे, शत्रूची क्षेपणास्त्रे आणि ड्रोन पाडणारी




प्रणाली किती प्रभावी ठरली हे संपूर्ण जगाने पाहिले आहे.

गेल्या ११ वर्षात भारताने शस्त्रास्त्र निर्मितीत स्वदेशीचा मंत्र निर्धाराने अंमलात आणला आहे. अन्य प्रगत राष्ट्रांप्रमाणे भारतातही जागतिक दर्जाची, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे निर्माण होत आहेत. आयएनएस विक्रांत, आकाश हवाई संरक्षण प्रणाली, रूस्तम यूएव्ही ड्रोन याची निर्मिती डीआरडीओद्वारे लखनौ येथे झाली आहे. रशियाच्या सहकार्याने आपण ब्रह्मोस्त्र क्षेपणास्त्र तयार केले आहे. संरक्षण उत्पादनात गेल्या १० वर्षात १७४ टक्के एवढी प्रचंड वाढ झाली आहे. शस्त्रास्त्रांची मोठी आयात करणारा देश म्हणून भारताची ओळख होती. ही ओळख गेल्या १० वर्षात मोदी सरकारने पुसून टाकली आहे. २०१४ ते २०२४ पर्यंत भारताने ८८ हजार ३१९ कोटी एवढ्या रकमेची संरक्षण उत्पादनाची निर्यात केली आहे. २०२४-२५ या एकाच वर्षात आपण २३ हजार ६२२ कोटी एवढी निर्यात केली. आपली संरक्षण विषयक आयात २१ टक्क्यांनी कमी झाली आहे. जवळपास ८० देशांना आपण संरक्षण उत्पादनांची निर्यात करत आहोत. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारतीय क्षेपणास्त्र आणि शस्त्रास्त्रांची भेदकता संपूर्ण जगाने अनुभवल्यामुळे जगभरातून आपल्या शस्त्रास्त्रांची मागणी वाढली आहे.

बाह्य सुरक्षेबरोबरच मोदी सरकारने अंतर्गत सुरक्षेलाही मोठे महत्व दिले आहे. नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी सुरक्षा दलांना आवश्यक ते बळ दिले गेले आहे. त्याचबरोबर नक्षलग्रस्त भागातील विकास योजनांकडेही प्रामुख्याने लक्ष दिले जात आहे. २०१४ मध्ये नक्षलग्रस्त जिल्ह्यांची संख्या १२६ होती आता २०२५ मध्ये ही संख्या अवघ्या ६ वर आली आहे. अनेक नामचीन नक्षलवादी नेते सुरक्षा





दलाबरोबरच्या चकमकीत ठार झाले आहेत. देश पूर्णपणे नक्षलमुक्त करण्याचा संकल्प मोदी सरकारने सोडला आहे. हा संकल्प लवकरच प्रत्यक्षात येईल. अंतर्गत सुरक्षेसाठी मोदी सरकारची अग्निवीर योजना महत्वाची ठरली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपली प्रत्येक दिवाळी सीमेवर असणाऱ्या लष्करी जवानांबरोबर साजरी करतात. सैनिकांच्या व्यथा, अडचणी जाणून घेणारा पंतप्रधान आपल्या नरेंद्र मोदींच्या रूपाने लाभला आहे. त्यामुळेच मोदी सरकारच्या हाती देश सुरक्षित आहे, अशी सामान्य माणसाची भावना आहे.

**(लेखक हे भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री आहेत.)**

# मोदी युगातील दिमाखदार नवा भारत!

● पीयूष गोयल, केंद्रीय वाणिज्य मंत्री

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये कारभाराची सूत्रे हाती घेतली तेव्हा देश एका महत्त्वाच्या वळणावर उभा होता. त्याकाळी भारत एक असा देश होता जिथे आकांक्षा तर होत्या पण त्या पूर्ण करण्याचा मार्ग धूसर होता. मात्र गेल्या ११ वर्षांत पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने ज्या पद्धतीने आणि वेगाने विकास केला आहे त्यामुळे आपला देश आज 'नव्या भारता'च्या रूपात जगासमोर उभा आहे. आजचा भारत आत्मविश्वासाने ओतप्रोत भरलेला, स्वावलंबित्व साध्य करण्याच्या दिशेने अग्रेसर आणि जागतिक पातळीवर स्वत:चे मत स्पष्ट मांडणारा देश आहे.



### जीवनमान सुधारण्यासाठी

या बदलाची सुरुवात गरिबांचे जीवनमान सुधारण्यापासून झाली. स्वातंत्र्यप्राप्तीला सहा दशके होऊन गेल्यानंतरदेखील देशवासीय शौचालय, पाणीपुरवठा आणि आरोग्यसेवा यांसारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित होते. इथूनच सुरुवात करत 'पंतप्रधान आवास योजना' आणि 'स्वच्छ भारत अभियान' यांसारख्या उपक्रमांतर्गत कोट्यवधी गरीब कुटुंबांना पक्की घरे आणि शौचालये बांधून देण्यात आली. 'उज्ज्वला योजने'च्या माध्यमातून स्वयंपाकाच्या गॅसची मोफत जोडणी देऊन कित्येक कोटी महिलांची धुराच्या त्रासापासून सोडवणूक केली गेली. तसेच 'आयुष्मान भारत'सारख्या आरोग्यसंबंधी योजनांनी गरिबांना पाच लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण देऊन आर्थिक संकटापासून वाचवले. 'हर घर जल' अभियानाच्या माध्यमातून कोट्यवधी ग्रामीण कुटुंबांना नळाने पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. या सर्व



योजना म्हणजे निव्वळ कागदी घोडे नाहीत, तर या सर्व सुविधा वास्तवात प्रत्यक्ष उपलब्ध झाल्या असून त्यांनी सामान्य माणसाचे जीवन बदलून टाकले आहे. 'जन–धन' योजनेच्या माध्यमातून स्वातंत्र्यानंतरच्या काळात प्रथमच कित्येक कोटी भारतीयांना बँकिंग व्यवस्थेशी जोडण्यात आले, आणि त्यायोगे देशातील आर्थिक समावेशनाला बळकटी मिळाली. पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात देखील भारताने ऐतिहासिक प्रगती केली आहे. ज्या गावांमध्ये एकेकाळी वीज आणि पक्के रस्ते स्वप्नवत वाटत होते तेथे आता सौर दिवे उजळले आहेत. देशाच्या कानाकोपऱ्यातील गावे राष्ट्रीय महामार्गांनी जोडली जातील याची खबरदारी घेण्यात आली आहे. शहरांमध्ये 'स्मार्ट सिटी अभियान' तसेच मेट्रो प्रकल्पांनी तेथील जनतेच्या जीवनाचा दर्जा लक्षणीयरीत्या सुधारला आहे.

भारताची ही विकासयात्रा डिजिटल बाबतीतही क्रांतिकारक ठरली आहे. 'डिजिटल इंडिया अभियान'ने देशाला तांत्रिकदृष्ट्या सक्षम बनवले आणि 'यूपीआय'ने आज भारताला जगातील सर्वाधिक डिजिटल आर्थिक देवाणघेवाण करणारा देश बनवले. आधार, मोबाईल फोन आणि जनधन या 'त्रिसूत्री'ने थेट लाभ हस्तांतरणाला अधिक सोपे बनवून भ्रष्टाचार तसेच मध्यस्थ यांना मिळणारा वाव बहुतांशरीत्या संपवूनच टाकला. यामुळे सरकारच्या योजनांचे लाभ थेट पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचू लागले आहेत. महिला सक्षमीकरण मोदी सरकारच्या मुख्य प्राधान्यक्रमांपैकी एक घटक आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियानापासून, बाळंतपणाच्या रजेत वाढ तसेच 'सुकन्या समृद्धी'सारख्या योजनांनी महिला आणि मुलींना सामाजिक तसेच आर्थिक बाबतीत सशक्त बनवले आहे. एनडीए आणि भारतीय सैन्यदलात महिलांना स्थायी कमिशन देण्यासारख्या उपक्रमांनी हे सिद्ध केले की, या सरकारसाठी महिला सक्षमीकरण ही केवळ एक घोषणा राहिलेली नसून ते सरकारी धोरण आणि शुद्ध हेतू दोन्हींचा भाग झाले आहे.

### शेतकरी, युवा

भारत एक कृषिप्रधान देश असूनही कृषी क्षेत्र दीर्घकाळापासून उपेक्षित राहिले आहे. सरकारच्या कागदोपत्री दाव्यांच्या उलट खरी स्थिती अशी होती की, शेतकऱ्यांना नाइलाजाने शेती करणे सोडून देऊन



नोकरीसाठी पलायन करावे लागत होते. गेल्या एका दशकात कृषी क्षेत्रामध्ये अभूतपूर्व बदल घडून आले आहेत. आज 'पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी'च्या माध्यमातून देशातील प्रत्येक छोट्या शेतकऱ्याला प्रत्यक्षात आर्थिक मदत देण्यात येत आहे. पीक विमा योजना, ई–नाम पोर्टल, सूक्ष्मसिंचन योजना तसेच ड्रोन तंत्रज्ञानाच्या वापराने शेतीला केवळ उत्पादनाच्या दृष्टीने नव्हे तर उत्पन्नाचा स्रोत या दृष्टीने देखील बळकट करण्यात येत आहे. त्याच प्रकारे, शिक्षण आणि कौशल्य विकास या क्षेत्रांमध्ये देखील अनेक ऐतिहासिक पावले उचलण्यात आली. नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या माध्यमातून शालेय शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत प्रत्येक स्तरावर गुणात्मक स्थित्यंतर झाले. मातृभाषेतील शिक्षणाला प्रोत्साहन, कौशल्याधारित शिक्षण तसेच दीक्षा, स्वयम आणि पंतप्रधान–विद्या यांसारखे डिजिटल अध्ययन मंच यांनी शिक्षणाला अधिक सुलभ आणि समावेशक रूप दिले आहे. 'स्किल इंडिया' अंतर्गत लाखो युवकांना रोजगाराला पूरक ठरणारे प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे युवक आता नोकरीची याचना करणारे नव्हे तर नोकऱ्या देणारे बनले आहेत.

कोविड–१९ महासाथीच्या काळात आरोग्याच्या क्षेत्रात भारताने जे ऐतिहासिक आणि वेगवान निर्णय घेतले ते संपूर्ण जगात नावाजले गेले. कोविड प्रतिबंधक लशीची स्वदेशी निर्मिती आणि कोविन पोर्टलचे यशस्वी परिचालन यांनी सर्वांना हे दाखवून दिले की, भारत आता केवळ वापरकर्ता राहिलेला नसून तंत्रज्ञान आणि विज्ञान यांचा निर्मातादेखील आहे. या सगळ्यासोबतच फिट इंडिया, योग दिन तसेच आयुष मंत्रालयाने धडाडीने राबवलेल्या कार्यक्रमांनी भारतीय जीवनशैलीला पुन्हा एकदा समयोचित बनवले आहे. पंतप्रधान मोदी यांच्या 'लोकलला ग्लोबल' बनवण्याच्या दूरदर्शी विचारांनी 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत अभियान' यांच्या माध्यमातून घरगुती उद्योग तसेच नवसंकल्पनांना

जागतिक स्पर्धेत उतरण्याचे सामर्थ्य दिले आहे. भारत आज जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा स्टार्टअप परिसंस्था असलेला देश बनला आहे आणि पीएलआय योजनेसारख्या प्रोत्साहनकारी उपक्रमांमुळे भारत आज मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक वस्तू, वाहन उद्योग आणि संरक्षण सामग्री यांच्या उत्पादनातदेखील स्वावलंबी होऊ लागला आहे.

### पायाभूत सुविधांचा विकास



गेली अनेक दशके, देशाला आवश्यक असलेल्या वेगाने पायाभूत सुविधा निर्मितीच्या क्षेत्रात प्रगती होऊ शकली नाही. गेल्या एका दशकभरात, 'भारतमाला', 'सागरमाला' आणि 'उडान' यांसारख्या योजनांनी देशाच्या दुर्गम भागांना रस्ते, रेल्वे, जलमार्ग आणि हवाई मार्गांनी जोडण्यात नवी उंची गाठली आहे. वंदे भारत रेल्वे गाड्या, बुलेट ट्रेन प्रकल्प आणि रेल्वेच्या विद्युतीकरणामुळे प्रवासाचा वेग तर वाढलाच, पण त्याचसोबत प्रवासाला पर्यावरणपूरक स्वरूपदेखील देण्यात आले आहे. संरक्षण आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या क्षेत्रातदेखील भारताने अभूतपूर्व असे स्वावलंबन मिळवले आहे. गेली अनेक दशके रेंगाळलेली 'एक रँक, एक निवृत्तिवेतन' योजना लागू झाली, ब्राह्मोस, आकाशसारख्या संरक्षण साधनांनी भारतीय सेनेचे सामर्थ्य तर वाढलेच, पण त्याचसोबत भारत आता जगातील अनेक देशांना शस्त्रास्त्रे निर्यातदेखील करत आहे. विक्रांतसारख्या विमानवाहू युद्धनौकेची उभारणी, अग्नी क्षेपणास्त्रांच्या मालिकेची निर्मिती आणि सीमेवर वेगाने उभारल्या जात असलेल्या पायाभूत सुविधा यांतून संरक्षणाप्रति भारताची बांधिलकी प्रतीत होते.

देशात एकीकडे आर्थिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रात विकास होत असताना दुसरीकडे सांस्कृतिक आणि धार्मिक पुनर्जागृतीने देखील समाजात नवे चैतन्य आणले. अयोध्येत श्रीराम जन्मभूमी मंदिराची उभारणी, काशी विश्वनाथ धाम, महाकाल लोक आणि केदारनाथ जीर्णोद्धारासारख्या प्रकल्पांनी सांस्कृतिक श्रद्धेला सन्मान आणि भव्यता दोन्ही मिळवून दिले आहे. योग दिनाला वैश्विक मान्यता मिळवून देऊन भारताने संपूर्ण जगाला भारतीय तत्त्वज्ञानाशी जोडण्याचे देखील कार्य केले आहे. स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणाच्या संदर्भात स्वच्छ भारत अभियानाने समाजात जागरूकतेची नवी क्रांती आणली. भारत आता शून्य कार्बन उत्सर्जन २०७० चे लक्ष्य साध्य करण्याच्या दिशेने प्रयत्नशील आहे आणि सौर ऊर्जा तसेच इलेक्ट्रिक गतिशीलतेत देखील प्रमुख भूमिका निभावत आहे.

### राष्ट्रीय पुनर्जागृती

आंतरराष्ट्रीय संबंधांच्या क्षेत्रात भारताने प्रथमच 'अनुकरणकर्ता' न होता इतर देश ज्याचे अनुकरण करतात अशा 'नेत्या'ची भूमिका निभावली आहे. जी ट्वेंटी परिषदेचे अध्यक्षपद, व्हॅक्सिन मैत्री, आंतरराष्ट्रीय सौर आघाडी तसेच ग्लोबल साऊथ देशांची बाजू मांडण्याचा आग्रह यांसारख्या उपक्रमांनी भारताला विकसनशील देशांचे नेतृत्व दिले आहे. भारत आता संयुक्त राष्ट्रांमध्ये स्थायी सदस्यत्व मिळण्यासाठी गांभीर्याने प्रयत्न करत आहे. संविधानातील कलम ३७० रद्द करण्याचा निर्णय असो, तीन तलाकसारखी सामाजिक कुप्रथा बंद करणे असो किंवा एक देश–एक करसारखी क्लिष्ट पण आवश्यक प्रणाली लागू करणे असो, कोणतेही निर्णय घेऊन राबवण्यात नरेंद्र मोदी सरकारची राजकीय इच्छाशक्ती हे या सरकारचे सर्वात मोठे वैशिष्ट्य ठरले आहे. पारदर्शक राज्य कारभार आणि तंत्रज्ञानाचा वापर करून देशात 'अंत्योदया'ला व्यावहारिक स्वरूप देण्यात आले आहे.

गेल्या ११ वर्षांच्या वाटचालीवर नजर टाकली तर असे स्पष्ट दिसून येते की, ही केवळ योजनांची यादी नाही तर राष्ट्रीय पुनर्जागृतीची सजीव प्रतिमा आहे. हा कालावधी केवळ आर्थिक अथवा भौतिक यशाचा नाही तर सांस्कृतिक आणि राजकीय जागरूकतेचे युग ठरला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने 'सर्वांची सोबत, सर्वांचा विकास, सर्वांचा विश्वास आणि सर्वांचे प्रयत्न' असा निश्चय केला होता, तो आता फक्त एक घोषणा न राहता भारताची ओळख बनला आहे. हे यश केवळ सरकारचे नाही तर ज्याने या निर्धारावर विश्वास ठेवला त्या प्रत्येक नागरिकाचे हे यश आहे आणि हीच २१ व्या शतकातील भारताची खरी ओळख आहे. ■

# सेवा, सुशासन, गरीब कल्याणाची 11 वर्षे

## पंतप्रधान जनधन योजना

● ३१ मे २०२५ पर्यंत ५५.४४ कोटी खाती, जनधन योजनेतून उघडण्यात आली.

● महिलांची ३०.९४ कोटी खाती उघडण्यात आली.

● ३६.९८ कोटी खाती ग्रामीण आणि निम्नशहरी क्षेत्रांमध्ये उघडण्यात आली.

● ३८.२० कोटी खात्यांना 'रूपे डेबिट कार्ड' जारी करण्यात आली.

● ऑगस्ट २०१५ मध्ये १७.९ कोटी जनधन खाती होती. म्हणजे योजना सुरू झाल्यानंतर अवघ्या एका वर्षात १७.९ कोटी खाती उघडण्यात आली.

## पंतप्रधान उज्ज्वला योजना

● १० कोटी ३३ कुटुंबांना १ मार्च २०२५ पर्यंत स्वयंपाकाच्या गॅसची जोडणी देण्यात आली.

● अर्जदार १८ वर्षांपेक्षा जास्त वयाची महिला असणे आवश्यक आहे. ती भारताची नागरिक असणे आवश्यक आहे.

● ती दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील असावी आणि घरातील इतर कोणाकडेही गॅस कनेक्शन नसावे.

● कुटुंबाचे एकूण मासिक उत्पन्न हे केंद्रशासित प्रदेश/राज्य सरकारांनी निर्धारित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त नसावे.

● ७५ लाख गॅस जोडण्या २०२५-२६ पर्यंत देण्यास मान्यता.

## आयुष्मान भारत

**● ९ कोटी ५६ लाख ७३ हजार ९५५ लोकांवर मे २०२५ अखेर १.३ लाख कोटी रु.पर्यंतचे उपचार करण्यात आले.**

● ३६.९ कोटी आयुष्मान कार्डचे मार्च २०२५ अखेर वाटप. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत तयार करण्यात आली.

● कोरोना संकट काळानंतर देशभरातील रुग्णालयातील आयसीयू बेडची संख्या १.४५ लाखापर्यंत वाढवण्यात आली आहे. ऑक्सिजन सुविधा देणाऱ्या बेडची संख्या ५.१५ लाखापर्यंत वाढवण्यात आली आहे.

● ७८ कोटी ३९ लाख ८० हजार लोकांची आभा कार्ड तयार करण्यात आली.

## पंतप्रधान स्वनिधी योजना

● कोरोना काळात फेरीवाले, छोटे व्यापारी, विक्रेते आर्थिकदृष्ट्या मोठ्या संकटात सापडले. उपेक्षित वर्गासाठी स्वनिधी योजना सुरू केली.

● फेरीवाल्यांना १० हजार, २० हजार आणि ५० हजार रुपयांचे कर्ज दिले जाते. आतापर्यंत १३ हजार ७९० कोटी एवढ्या रकमेची कर्जे मंजूर करण्यात आली आहेत.

● ९६ लाख ७ हजार २१४ जणांना या योजनेंतर्गत कर्ज पुरवठा करण्यात आला आहे. ही बिनव्याजी कर्ज योजना सुरू करण्यात आली. यासाठी कोणतेही तारण घेतले जात नाही.

## नारी शक्ती

**● बेटी बचाओ, बेटी पढाओ योजनेंतर्गत ४ कोटीपेक्षा जास्त अधिक सुकन्या समृद्धी योजना खाती उघडली. सुमारे ३ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम जमा.**

● १२.२८ कोटी मुलींचे नामांकन उच्च माध्यमिक वर्गापर्यंतच्या शालेय शिक्षणाच्या २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात.



● २.०१ कोटीपेक्षा जास्त मुलींनी प्रथमच उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला.

● एप्रिल २०१५ पासून सुरूवात केलेल्या महिला हेल्पलाईनमार्फत. ६९.७५ लाखापेक्षा अधिक महिलांना मदत करण्यात आली.

● नोकरदार महिलांची पगारी बाळंतपण रजा २६ आठवड्यापर्यंत वाढवली. पूर्वी ही रजा १२ आठवडे होती.

● मुद्रा योजनेंतर्गत महिला कर्जदारांना १४.७२ लाख कोटी इतक्या रकमेचे कर्ज वाटप.

● ३ कोटी महिलांना लखपती दीदी बनवण्याचे उद्दिष्ट.

● लोकसभा आणि विधानसभामध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण मंजूर.

● बेटी बचाओ, बेटी पढाओ योजनेमुळे भारतातील लिंग गुणोत्तर प्रमाण १०२० पर्यत वाढले आहे.

● स्वच्छ विद्यालय अभियानामुळे शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृह बांधले जात आहे.

## पंतप्रधान मातृ वंदना योजना

● गरोदरपणात आणि बाळांतपणात महिलांना आवश्यक त्या आरोग्य सेवा सुविधा पुरवण्यासाठी, कुपाषेणाचा प्रभाव कमी करण्यासाठी, माता आणि बालकाचे आरोग्य सुधारण्यासाठी मातृ वंदना योजनेंतर्गत पहिले अपत्य झाल्यावर दोन हप्त्यात ५ हजारांचे अर्थसहाय्य केले जाते.

● १ एप्रिल २०२२ नंतर दुसरी अपत्य मुलगी झाल्यानंतरही महिलांना या योजनेचा लाभ दिला जातो.

● या योजनेचा लाभ ३१ मे २०२५ अखेर ४.२ कोटी महिलांना झाला आहे. आतापर्यंत या योजनेतून १८ हजार ८४५ कोटी रु. लाभार्थ्यांना देण्यात आले आहे.

## सैनिकी शाळांमध्ये मुलींना प्रवेश



● सैनिकी शाळांमध्ये मुलींना प्रवेश देण्याचा निर्णय २०१८-१९ मध्ये प्रायोगिक तत्वावर अंमलात आणला गेला. त्याला मिळालेले यश पाहून सर्व सैनिकी शाळांमध्ये मुलींसाठी १० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या.

● २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात ३२० मुलींना देशभरातील ३३ सैनिकी शाळांमध्ये प्रवेश देण्यात आला.

● २०२२-२३ या वर्षासाठी सैनिकी शाळांमध्ये मुलींसाठी ३३५ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या नोव्हेंबर २०२१ मध्ये झालेल्या प्रवेश परिक्षेत १ लाख १६ हजार ८९१ मुलींनी भाग घेतला.

## पंतप्रधान आवास योजना

● गोरगरिबांचे मालकीच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पंतप्रधान आवास योजना सुरू करण्यात आली आहे.

● या योजनेत मे २०२५ पर्यंत ४ कोटीहून अधिक घरे बांधण्यात आली आहे. पंतप्रधान आवास शहरी योजनेंतर्गत १ कोटी १६ लाख ९७ हजार घरे बांधण्यास मंजुरी देण्यात आली. त्यापैकी ९३ लाख घरे बांधून पूर्ण झाली.

● आवास योजना ग्रामीण अंतर्गत ३ कोटी ७२ लाख ६४ हजार ८२० घरे मंजूर करण्यात आली. त्यापैकी २ कोटी ७७ लाख ७४ हजार घरे बांधून पूर्ण झाली.

## शौचालय बांधणी योजना



**● स्वच्छ भारत मोहिमेंतर्गत शहरी आणि ग्रामीण भागात गोरगरीब वर्गाला शौचालय बांधणीसाठी कर्ज दिले जाते. डिसेंबर २०२४ अखेर १२ कोटीहून अधिक शौचालये बांधण्यात आली आहेत. प्रत्येकी शौचालय बांधणीसाठी १२ हजार रुपये अनुदान दिले जाते.**

●ही योजना गरीब आणि दारिद्र्यरेषेखाली आहे.

●दारिद्र्यरेषेखाली असल्याचे कार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक खाते पुस्तक ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

●स्वच्छ भारत मोहिमेखाली ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागात ही योजना राबवली जाते.

## स्टार्टअप इंडिया




●१.७६ लाख स्टार्टअप्सना मे २०२५ पर्यंत मिळाली मान्यता. यापैकी ११८ स्टार्टअप झाले युनिकॉर्न.

●१६.६ लाख नोकऱ्या, स्टार्टअप इंडिया सुरू झाल्यापासून निर्माण झाल्या आहेत. (जानेवारी २०२५ अखेर.)

●२६.५ हजारापेक्षा जास्त संस्थांना २०२२ मध्ये मान्यता.

●२३ लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नोकऱ्या टेक स्टार्टअपद्वारे निर्माण झाल्या आहेत. २०१७ ते २०२१ या कालावधीत असे नॅसकॉमच्या पाहणी अहवालात म्हटले आहे.

## रस्ते, पूल उभारणी



●गेल्या १० वर्षात ३.९६ लाख किलोमीटर एवढ्या लांबीचे ग्रामीण भागातील रस्ते बांधण्यात आले.


●गेल्या ५ वर्षात ३ हजार ६०० किलोमीटर लांबीचे हायस्पीड कॉरिडोर उभारण्यात आले.

●जगातील सर्वाधिक लांबीचा भोगदा अटल टनेलच्या रूपाने भारतात तयार झाला. अटल टनेलची लांबी १० हजार फूट एवढी आहे.

●मुंबईतील अटल सेतू, कोस्टल रोडसारख्या प्रकल्पांमुळे वाहन चालकांच्या वेळेची बचत झाली.

●अटल सेतूसाठी १७ हजार ८४० कोटी रुपये खर्च करण्यात आले.

## शेतकरी हिताय




**●पीक विमा योजनेत ५५.४९ कोटी शेतकऱ्यांची नोंदणी.**

**●२३.२२ कोटी शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात आली.**

**●पीक विमा दाव्यांवर शेतकऱ्यांना १.७६ लाख कोटी रुपयांची नुकसानभरपाई.**

●२.८१ लाख रुपयांची रक्कम १५ हप्त्यांमध्ये ११.२७ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना अदा.

●२८,६४८ प्राथमिक कृषी पतसंस्था प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्र म्हणून कार्यरत आहेत.

●२५ कोटी मृदा आरोग्य कार्ड शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आली.

●पंतप्रधान धन-धान्य योजनेचा देशभरातील १०० जिल्ह्यातील १.७ कोटी शेतकऱ्यांना फायदा होणार.

●किसान क्रेडीट कार्डद्वारे मिळणाऱ्या कर्जाची मर्यादा ३ लाखांवरून ५ लाखांपर्यंत वाढवण्यात आली आहे.

●ई-नामद्वारे देशभरातील १ हजार ४७३ कृषी बाजार समित्या जोडण्यात आल्या आहेत.

●पंतप्रधान किसान कल्याण योजनेद्वारे आतापर्यंत ३.७ लाख कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात आले आहे.

●कृषी पायाभूत सुविधा निधीसाठी १ लाख कोटी रुपयांची तरतूद.

●डाळी आणि तेलबियांच्या किमान आधारभूत किमतीमध्ये मोठी वाढ करण्यात आली आहे.



## सूर्य घर मोफत योजना



● १० लाखांहून अधिक कुटुंबांना ३०० युनिटपर्यंत मोफत वीज मिळते आहे.

● दोन किलोवॅटसाठी साठ हजार रुपये व तीन किलोवॅटसाठी ७८ हजार रुपये अनुदान केंद्र सरकारकडून थेट दिले जाते.

● घराच्या छतावर सोलर वीजनिर्मिती प्रकल्प बसवून सौरऊर्जेचा वापर करून वीजनिर्मिती करायची व ती वीज घरी वापरून विजेची गरज पूर्ण करायची, अशी ही योजना आहे. गरजेपेक्षा अधिक वीजनिर्मिती झाल्यावर वीजबिल शून्य येते अर्थात वीज मोफत मिळते.

## सौर उर्जा निर्मितीचा विक्रम



● **पंतप्रधान कुसुम योजनेंतर्गत ४९ लाख कृषी पंप सौर उर्जेवर चालणार. शेतकऱ्यांना दिवसा व मुबलक वीज पुरवठा करण्याचे उद्दिष्ट साध्य होणार.**

● राजस्थानातील भादला येथे जगातील सर्वात मोठे सोलर पार्क सुरू. **या पार्कमध्ये २ हजार २४५ मेगावॅट विजेची निर्मिती होणार.**

● विजेची बचत करणाऱ्या ३६.८७ कोटी एलईडी बल्बचे वाटप.

● पवन उर्जा क्षेत्रातही भारताची मोठी झेप. **मार्च २०२५ अखेर पवन उर्जेद्वारे ५०.४ गिगावॅट एवढ्या उर्जेची निर्मिती.**

● पंतप्रधान कुसुम योजनेंतर्गत ४९ लाख कृषी पंप सौर उर्जेवर चालणार.

## पीएम मुद्रा योजना



● मे २०२५ अखेरपर्यंत ५२.५ कोटी छोट्या व्यावसायिकांना कर्जे देण्यात आली.

● मे २०२५ अखेर ३३ लाख कोटीहून अधिक रकमेची कर्जे देण्यात आली.

● ६८ टक्के महिला उद्योजकांना कर्ज देण्यात आले.

● मोठ्या उद्योगांकडून अधिक रोजगार मिळतो, मात्र आपण बारकाईने पाहिले तर त्यात केवळ १.२५ कोटी रोजगार मिळतो. एवढ्या मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवले आहे. या देशात छोटे काम करणारे ५.७० कोटी लोक १२ कोटी लोकांना रोजगार देतात.

## जीवन ज्योती विमा योजना



● पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेचा लाभ २३ कोटीपेक्षा अधिक लोकांना झाला आहे.

● **पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेत १८ हजार ३९७ कोटी रुपयांची भरपाई देण्यात आली आहे.**

● १८ ते ५० वयोगटातील लोकांना या योजनेचा लाभ घेता येतो. या योजनेत ४३६ रुपयाच्या वार्षिक हप्त्यावर २ लाखाचे विमा संरक्षण दिले जाते.

● मृत्यू झाल्यावर त्या व्यक्तीच्या वारसदाराला / कुटुंबियांना २ लाख रुपये दिले जातात. दरवर्षी या योजनेचे नूतनीकरण करावे लागते.

## सुरक्षा विमा योजना



● पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेत ५१ कोटी ६ लाख लोकांनी नोंदणी केली आहे.

● पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेत १८ ते ७० वयोगटातील लोकांना १ वर्षासाठी अपघात विमा संरक्षण दिले जाते. अपघाती मृत्यू झाल्यास कुटुंबियांना २ लाख रुपये दिले जाते. अपघातात अपंगत्व आल्यास २ लाख रुपयांचे अर्थसहाय्य केले जाते.

● **सुरक्षा विमा योजनेत ३ हजार १२१ कोटी रुपयांची भरपाई मे २०२५ अखेर देण्यात आली.** अटल पेन्शन योजनेत ७.६६ कोटी लोकांनी नाव नोंदणी केली आहे. १८ ते ४० वयोगटातील लोकांना सहभाग घेता येतो.

## शिक्षण क्षेत्र



● ८ नव्या आयआयएम (व्यवस्थापन शास्त्र) स्थापना.

● देशातील आयुर्विज्ञान स्थांनची (एम्स) ही संख्या ३ पटीने वाढून आता २३ झाली.

● ७ नव्या आयआयटी संस्था सुरू. (२०१४ मध्ये देशात १६ आयआयटी होत्या.)

● देशभरात ५७० विद्यापीठांची निर्मिती.

● वैद्यकीय शिक्षण महाविद्यालयातील जागा आता १ लाख १८ हजार १८९ (२०१४ मध्ये वैद्यकीय महाविद्यालयातील जागा होत्या ५१ हजार ३४८).

## कौशल्य विकास

Skill India
Pradhan Mantri Kaushal Kendra

● पंतप्रधान कौशल्य विकास योजनेंतर्गत युवकांना विविध व्यवसाय, उद्योगांचे मोफत प्रशिक्षण दिले जाते.

● आतापर्यंत १.४२ कोटी युवकांना या योजनेंतर्गत प्रशिक्षण देण्यात आले.

● या योजनेसाठी १.१० कोटी युवकांची निवड करण्यात आली आहे.

● देशातील पहिल्या फॉरेन्सटीक विद्यापीठाची निर्मिती.

● युवकांना रोजगार देण्यासाठी १५ रोजगार मेळाव्यांचे आयोजन, यात निवड झालेल्या युवकांना सरकारी नोकरीची संधी दिली जाते. पंतप्रधान इंटनरशीप योजनेमध्ये १ कोटी युवकांना मोफत प्रशिक्षण देणार.

## खेलो इंडिया

● मोदी सरकारने देशातील क्रीडापटूंना प्रोत्साहन देण्यासाठी खेलो इंडिया ही योजना सुरू केली आहे. या योजनेतून वेगवेगळ्या प्रकारतील खेळाडूंना अर्थसहाय्य केले जाते.

**● आतापर्यंत या योजनेंतर्गत २७ हजार ५०० हून अधिक खेळाडूंना अर्थसहाय्य दिले गेले.**



● खेला इंडिया स्पर्धांमध्ये ४५ हजार ५३० खेळाडूंनी भाग घेतला आहे.

● देशभरात १ हजाराहून अधिक खेलो इंडिया केंद्र सुरू करण्यात आली आहे. या स्पर्धातून निवड केलेल्या खेळाडूंना शिष्यवृत्ती दिली जाते.

● या शिष्यवृतीतून खेळाडूंना आवश्यत ते क्रीडा साहित्य, उपकरणे खरेदी करता येतात. शिष्यवृत्तीचे पैसे खेळाडूंच्या खात्यात थेट जमा होतात.

● टार्गेट ऑलिपिंक पोडियम या योजनेच्या माध्यमातून खेळाडूंना ५० हजार रुपये भत्ता दरमहा दिला जातो. या खेरीज उत्तम दर्जाचे प्रशिक्षण आवश्यत्या तांत्रिक सुविधा, साहित्य, उपकरणे हे ही या योजनेच्या माध्यमातून पुरविले जाते.

● पी.व्ही.सिंधूसारख्या खेळाडूंना या योजनेचा फायदा झाला आहे.

**● देशातील २५०० युवा खेळाडूंना दरवर्षी ६ लाख २८ हजार एवढा भत्ता खेलो इंडिया योजनेच्या माध्यमातून दिला जात आहे.**

## खादी ग्रामोद्योगाला प्रोत्साहन

● मोदी सरकारने खादी, ग्रामोद्योग या क्षेत्राला प्रोत्साहन दिल्यामुळे खादी ग्रामाद्योग आयोगाची उलाढाल.

● गेल्या ११ वर्षांत विक्रीत ४४७ टक्के, उत्पादनात ३४७ टक्के आणि रोजगार निर्मितीत ४९.२३ टक्के वाढ झाली आहे.

● २०१३-१४ या आर्थिक वर्षात ३११५४.१९ कोटी रुपये असलेली विक्री. **२०२४-२५ या आर्थिक वर्षात जवळजवळ पाच पटीने वाढून १ लाख ७० हजार कोटी रुपयांवर पोहोचली. विक्री आणि नवीन रोजगार निर्मितीत एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे.**

## डिजिटल इंडिया

● **४४ लाख कोटी रुपये थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत.**

● 'डीबीटी'मुळे सरकारची ३.४८ लाख कोटी रूपयांची बचत झाली आहे.

● डिजिटल परिवर्तन - २०१४ मध्ये, भारत प्रामुख्याने रोखीवर आधारित अर्थव्यवस्था होती ज्यामध्ये डिजिटल व्यवहारांची फारशी भूमिका नव्हती.

● २०१६ मध्ये युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (UPI) लाँच झाल्यामुळे डिजिटल पेमेंट्स सामान्य माणसासाठी सुलभ आणि सुलभ झाले.

## पंतप्रधान जनऔषधी केंद्र



● सामान्य जनतेला परवडणाऱ्या दरात औषधे उपलब्ध करून देण्यासाठी पंतप्रधान जनऔषधी केंद्र ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेत ५० ते ९० टक्के कमी किमतीत वेगवेगळी औषधे मिळतात.

● **देशभरात १६ हजारपेक्षा अधिक जनऔषधी केंद्र सुरू.**

● बाल मृत्यू व आजारांची संख्या कमी करण्यासाठी मिशन **इंद्रधनुषअंतर्गत ६.७८ कोटीहून अधिक महिला आणि बालकांना वैद्यकीय कवच देण्यात आले आहे.** या योजनेत २ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांचे आणि गर्भवती महिलांचे लसीकरण केले जाते.

## आयुष्मान भारत वय वंदना योजना



● आयुष्मान वय वंदना योजनेत ७० वर्षापेक्षा अधिक नागरिकांना ५ लाखापर्यंतचे वैद्यकीय उपचार मोफत दिले जातात. त्यासाठी या नागरिकांना आयुष्मान वय वंदना कार्ड दिले जाते.

● या योजनेत आतापर्यंत ५८ लाखांपेक्षा अधिक ज्येष्ठ नागरिकांनी नाव नोंदणी केली आहे.

● या योजनेचा फायदा घेण्यासाठी फक्त आधारकार्डची आवश्यकता आहे.

● या योजनेंतर्गत मे २०२५ अखेर ४९६ कोटी रुपयापर्यंतचे उपचार उपलब्ध करण्यात आले.

● देशभरातील वैद्यकीय प्रयोगशाळांची संख्या ३ हजार ४०० पर्यंत वाढवण्यात आली आहे.

## सौभाग्य योजना

● सौभाग्य योजनेमुळे ग्रामीण भागात १०० टक्के विद्युतीकरण झाले आहे. ३ कोटी घरांना या योजनेंतर्गत वीजपुरवठा केला गेला आहे.

● दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेंतर्गत १९ हजार दुर्गम खेड्यांमध्ये वीज पोहचवली गेली.

● पंतप्रधान उजाला योजनेंतर्गत मे २०२५ अखेर **३६.८७ कोटी एवढ्या एलईडी बल्बचे वितरण करण्यात आले आहे.**

● नागरिकांची वार्षिक १९ हजार १५३ कोटी एवढी बचत झाली आहे. तसेच कार्बनडायऑक्सिडच्या उत्सर्जनात दरवर्षी ३.८७ कोटी एवढी घट झाली आहे.

## विश्वकर्मा योजना

● सुतार, लोहार, सोनार, कुंभार, धोबी, शिल्पकार, मेस्त्री, मच्छीमार, मोची कारागिर, टोपली-चटई झाडू बनवणारे, शिंपी, केशकर्तनाचा व्यवसाय करणाऱ्या, छोट्या व्यावसायिक, बाहुली आणि अन्य पारंपरिक खेळणी उत्पादन करणाऱ्यांना कर्ज पुरवठा केला जातो.

● या कारागिरांना ३ लाखापर्यंत कर्ज या योजनेतून दिले जाते.

● या योजनेसाठी मे २०२५ पर्यंत २९ लाख ९० हजार ५८३ कारागिरांना कर्ज पुरवठा मंजूर झाला आहे. २ कोटी ७० लाख ८६ हजार ५०६ कारागिरांनी या योजनेसाठी नाव नोंदणी केली आहे.

# जगातील सर्वाधिक उंचीचा पूल भारतात



● नदीपासून ३५९ मीटर उंचीवर वास्तुशिल्पाची अद्भुत रचना असलेला चिनाब रेल्वे पूल हा जगातील सर्वात उंच रेल्वे आर्च ब्रिज आहे.

● या पुलाचा एक महत्त्वाचा लाभ जम्मू आणि श्रीनगरमधील कनेक्टिव्हिटी वाढविण्यात होईल.

● पुलावरून जाणाऱ्या वंदे भारत ट्रेनद्वारे, कटरा आणि श्रीनगर दरम्यान प्रवास करण्यासाठी फक्त ३ तास लागतील.

● अंजी ब्रिज हा भारतातील पहिला केबल-स्टेड रेल्वे ब्रिज आहे जो आव्हानात्मक प्रदेशात देशाची सेवा करेल.

● ४३,७८० कोटी रुपये खर्चाच्या या २७२ किमी लांबीच्या USBRL प्रकल्पात ३६ बोगदे (११९ किमी लांबीचे) आणि ९४३ पूल समाविष्ट आहेत.

● राष्ट्रीय महामार्ग-७०१ वरील रफियाबाद ते कुपवाडा पर्यंतच्या रस्ता रुंदीकरण प्रकल्पाची आणि राष्ट्रीय महामार्ग-४४४ वरील शोपियान बायपास रस्त्याच्या बांधकामाची पायाभरणी केली.

● कटरा येथे ३५० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या श्री माता वैष्णोदेवी वैद्यकीय उत्कृष्टता संस्थेची पायाभरणी.

## जल जीवन मिशन



● १९.२४ कोटी ग्रामीण कुटुंबे देशात आहेत.

● १५ ऑगस्ट, २०१९ पर्यंत नळ जोडण्या ३.२३ कोटीच होत्या.

● मे २०२५ अखेर १५ कोटी ६३ लाख ९५ हजार ग्रामीण कुटुंबांना घरात नळाद्वारे पाणी मिळत आहे.


● १०.५३ कोटीहून अधिक कुटुंबांना साडेचार वर्षांपेक्षा कमी कालावधीत देण्यात आल्या नवीन जोडण्या.

● १ लाख ९९ हजार १५० गावांतल्या प्रत्येक घरात आत पोहोचले नळाद्वारे पाणी.

● २,१११ पेयजल चाचणी प्रयोगशाळा आहेत. त्यापैकी १३२४ ना एनएबीएलकडून मान्यता मिळाली आहे.

# सुरक्षित भारत, समृद्ध भारत

**या ११ वर्षात 'सुरक्षित भारत, समृद्ध भारत' ही सामान्य भारतीयांच्या मनातील आकांक्षा पूर्ण करत जगाला नव्या भारताचा परिचय करून दिला आहे. पहलगाम येथे झालेल्या पर्यटकांच्या हत्येनंतर मोदी सरकारने तातडीने दहशतवाद्यांना पाठीशी घालणाऱ्या पाकिस्तानच्या हद्दीत घुसून दहशतवाद्यांचे तळ नष्ट करून टाकले. पाकिस्तान सरकारने भारताच्या या कृतीला आतताई उत्तर देण्याचा प्रयत्न करताच भारतीय सैन्य दलाने पाकिस्तानला असा काही दणका दिला की, पाकिस्तानच्या लष्करशहा आणि राज्यकर्त्यांनी भारतापुढे लोटांगण घातले.**



● पाकिस्तानच्या दहशतवाद्यांना धडा शिकवल्यानंतर भारतीय हद्दीत घुसण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाकिस्तानचे नाक कापले गेले. या 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारतीय बनावटीच्या शस्त्रास्त्रांनी मोलाची कामगिरी बजावली. ५-१० किलो स्फोटके घेऊन जाणाऱ्या ड्रोन्सचे ठवे सोडणारी 'आकाशतीर'सारखी यंत्रणा ही मोदी सरकारची कामगिरी आहे.

● 'मेक इन इंडिया' अभियानात संरक्षण उत्पादनावर भर दिल्यामुळे देशाच्या संरक्षण सिद्धतेत भारत पूर्णपणे आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने वाटचाल करू लागला आहे, ही मोदी सरकारची कामगिरी आहे. जागतिक दर्जाच्या संरक्षण प्रणालीची निर्मिती भारत करू शकतो हे मोदी सरकारने गेल्या ११ वर्षात जगाला दाखवून दिले आहे.

● गेल्या वर्षभरात मोदी सरकारने वक्फ दुरुस्ती विधेयकासारखे महत्वाचे निर्णय घेत आपली निर्धार शक्ती दाखवून दिली आहे.

● मोदी सरकार-३ च्या पहिल्या १०० दिवसात पायाभूत सुविधा विकासाचे ३ लाख कोटी रूपयांचे प्रकल्प सुरू करण्यात आले. त्यात महाराष्ट्रातील वाढवण बंदराचा समावेश आहे. आजवर कधीच रस्त्याने जोडली गेली नाहीत अशी २५ हजार गावे रस्त्याने जोडण्याची ४९ हजार कोटी रूपयांची योजना सुरू करण्यात आली आहे.

● आजवर दुर्लक्षित राहिलेल्या मध्यमवर्गाचे १२ लाख रुपयेपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करणे, वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ७५ हजार नव्या जागा वाढवणे, कांदा, बासमती तांदळावरील निर्यात मूल्य हटवणे, खरीप पिकांचे आधारभूत मूल्य १०० ते ५५० रुपयापर्यंत वाढवणे, तरुणांसाठी २ लाख कोटींचे पॅकेज, भांडवली खर्च ११ लाख ११ हजार कोटी रुपयापर्यंत वाढवणे, आयुष्मान  वय वंदना योजनेतून ७० वर्षा पुढील नागरिकांना ५ लाखापर्यंतचे वैद्यकीय उपचार मोफत देणे, यासारख्या अनेक निर्णयातून मोदी सरकारच्या सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणाच्या निर्धाराची प्रचिती येत आहे.

● गेल्या वर्षभरात ५० लाखाहून अधिक लखपती दीदींची नोंदणी झाली आहे. हा उपक्रम सुरू झाल्यापासून १.२५ कोटी महिला लखपती दीदी झाल्या आहेत. ■

# 'कसलं डिजिटल...?'




● प्रकाश गाडे

> कसलं डिजिटल ९ फेब्रुवारी २०१७, राज्यसभेत काँग्रेस नेते आणि माजी वित्तमंत्री पी. चिदंबरम यांनी मोदी सरकारच्या डिजिटल इंडिया मोहिमेची खिल्ली उडवत केलेलं हे विधान आहे.

**त्याही** पुढे जाऊन चिदंबरम म्हणतात.. तुम्ही तिथं (खेडेगावात) जा, आणि लोक विचारतात 'कसलं डिजिटल?'


खोटं लपवणं खूप अवघड असतं. आणि खोटं लपवायचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे सर्वांत मोठं खोटं बोलणं!

हे विधान देशाच्या माजी वित्त मंत्र्यांचे व ज्येष्ठ काँग्रेस नेत्याचे ही केवळ टीका नव्हती, ही भारताच्या डिजिटल स्वाभिमानावर आघात करणारी अपरिपक्व आणि होपलेस अशी प्रतिक्रिया होती. देशाला दिशा दाखवणारा अर्थमंत्री म्हणून काँग्रेसने त्यांना अर्थमंत्री केलं त्यांचं हे विधान ऐकून सगळेच अवाक झाले.

चिदंबरम यांच्या वक्तव्यानंतर देशात अभूतपूर्व अशी डिजिटल क्रांती घडली जे जगात कोणत्याही देशात घडली नाही.

त्यानंतर ७ वर्षांत काय घडलं? याच उत्तर आकड्यांत आहे, भावनेतही सुद्धा आहे!

काँग्रेसी गुलामांनी ही माहिती वाचली पाहिजे. तुमच्या मोबाईलमधून जे G - PAY , UPI PAY, Phone - Pay तसेच तुमच्या मोबाईलमधील मोबाईल बँकिंगदेखील डिजिटल इंडियाचा भाग आहे. तुम्ही विकास कुठं झाला म्हणता ना, मोबाईल ओपन करून बघा, तुम्ही वापरत




असलेल्या फोनवर 5G इंटरनेट सुद्धा मोदी सरकारच्या काळात सुरू झालं.

**चिदंबरम यांच्या वक्तव्यानुसार कसलं डिजिटल? हे आता आपण पाहूया..**

● UPI – 'कसलं डिजिटल?' ला उत्तर: जगातील सर्वात वेगवान पेमेंट सिस्टीम!

● जेंव्हा घोषणा झाली त्यावर्षी (२०१७) ०.९३ कोटी व्यवहार झाले.

● आज २०२५ मध्ये १८६७ कोटी व्यवहार म्हणजे तब्बल २५०० पटीने वाढ झाली.

● २६० लाख कोटींहून अधिक रुपयांचे डिजिटल व्यवहार झाले. (एका विकसित देशाचा GDP असेल एवढे व्यवहार फक्त डिजिटल आहेत)

● भारताचा ग्रामीण भाग सोडाच देशाबाहेर सुध्दा इंडियन UPI पेमेंट पोहचलं आहे. सिंगापूर, फ्रान्स, श्रीलंका, नेपाळसारख्या देशांत UPI काम करत आहे.

**पी चिदंबरम साहेब, जेव्हा पानपट्टीवरचा चहा विक्रेताही QR कोड लावतो, तेव्हा 'कसलं डिजिटल?' हे तुमचं विधान देशद्रोहासारखं वाटतं.**

● DBT थेट लाभार्थी ट्रान्सफर : थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात मदत, दलाली संपली, १ रुपये पाठवलं तर १ रुपया कोणतेही चाळणी न होता लाभार्थ्यांना मिळतो.

● काँग्रेसच्या काळात २०१३–१४ फक्त ७ हजार ३६८ कोटी DBT ट्रान्सफर होते. तेच पंतप्रधान मोदीजींनी फक्त १० वर्षात २०२४–२५७ लाख कोटी रुपये एवढे DBT च्या माध्यमातून जनतेला पाठवले आहेत.

● DBT मुळे दलाली संपली त्यामुळे व्यवहारात पारदर्शकता आली आणि सरकारचे ३.४८ लाख कोटी रुपये वाचले.

● देशातील ४४ कोटी लाभार्थ्यांना DBT द्वारे त्यांचे पैसे त्यांच्या खात्यात जमा होतात.

● UP सरकार जे सुरू करू शकले नाही, ते मोदीजींनी पारदर्शकतेसह पूर्ण केलं.

● Digi Locker : 'कसलं डिजिटल?' ला उत्तर: मोबाईलमध्ये संपूर्ण सरकारी ओळख ठेवण्यास सुरवात झाली.

● ८५२ कोटीहून अधिक कागदपत्रे आज डिजी लॉकरमध्ये सुरक्षित आहेत.

● देशात ५२ कोटी युजर्स डिजी लॉकर वापरतात.

● CBSE ची मार्कशीट असो वा आधार कार्ड सर्व काही मोबाईलमध्ये आपल्या हातात आहे.

● CoWIN: संपूर्ण देशात लसीकरणाचं डिजिटल मॉडेल.

● १११ कोटी लोक नोंदणीकृत २२० कोटी लस डोस.

जगाने कौतुक केलं, WHO ने डिजीटल कसं असला पाहिजे याच उत्तम उदाहरण मानलं आहे.

● e-Sanjeevani : कसलं डिजिटल..? मोदीजींनी आरोग्य सुद्धा ऑनलाइन आणलं.

● ३७ कोटी आरोग्य विषयक डिजिटल सल्ले उपलब्ध केले.

● ५६% महिला लाभार्थी आरोग्य विषयक सल्ले घेतात.

● १ लाख ३२ हजार आरोग्य केंद्रे e-Sanjeevani शी जोडलेली आहेत.

● डिजीटल इंडिया नाकारणाऱ्या पी. चिदंबरम यांनी आणखी हास्यास्पद विधान केलं ते म्हणजे... Digital India ही संकल्पना भाजपची नाही, ती भारताच्या नव्या पिढीची आकांक्षा आहे. चिदंबरम यांचं वक्तव्य हे फक्त राजकीय मजबुरी मधून निघालेलं होत.

● जेव्हा मोदीजींनी पायाभूत टेलिकॉम, इंटरनेट




कनेक्टिव्हिटी, डिजिटल साक्षरता, आणि सुलभ सेवा पुरवण्यावर भर दिला, तेव्हा काँग्रेसने फक्त हसण्याचा प्रयत्न केला.

- काँग्रेस डिजिटल इंडियावर हसली, पण जनता हसली नाही. जनता काँग्रेसवर हसली आणि थुंकली सुद्धा.
- देशातील जनतेने मोबाईलवरून व्यवहार सुरू केला.

CSC केंद्रांची संख्या ९६ हजार वरून ५ लाख ३४ हजारावर गेली.

- ब्रॉडबँड इंटरनेट वापरकर्ते २५ कोटी वरून ९४ कोटी पार झाले.
- महत्वाचे म्हणजे भारत झाला जगातील सर्वात स्वस्त डेटा देणारा देश झाला.

### खोटं कोण बोललं,
### हे आज देश पाहतो आहे...!

चिदंबरम यांनी 'मोठं खोटं' बोलणं म्हणजे डिजिटल इंडिया आहे असं म्हटलं, पण आज भारताचं डिजिटल मॉडेल संपूर्ण जग अवलंबत आहे. त्यांनी उडवलेली खिल्ली, हीच आज देशाची ताकद बनली आहे.

जेव्हा एखाद्या नेत्याला देशाच्या भविष्याची कल्पना नसते, तेव्हा तो तंत्रज्ञानावर विनोद करतो. पण जेव्हा नेतृत्व दूरदृष्टीचं असतं, तेव्हा ते डिजिटल भारत निर्माण करतं 11YearsOfDigitalIndia चिरस्थायी, समावेशक, आणि जागतिक...! ■

# मोदी सरकारच्या काळात महाराष्ट्राला काय मिळाले...

**महाराष्ट्रात** रेल्वेच्या पायाभूत सुविधांना चालना देण्यासाठी केंद्र सरकारने १ लाख ७३ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. यावर्षी बजेटमध्ये महाराष्ट्रासाठी २३ हजार ७७८ कोटींची तरतूद केली आहे. यूपीएची सत्ता होती तेव्हा फक्त १ हजार १७१ कोटींचा रेल्वे बजेट मिळत होते. आता मोदींच्या कार्यकाळात त्यात २० पटीनं वाढ झाली आहे.

गोंदिया–बल्लारशाह डबलिंग या २४० किमीच्या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली. हा प्रकल्प अंदाजे ४८१९ कोटी रुपयांचा आहे. गोंदिया–बल्लारशाह प्रोजेक्टमुळे विदर्भ, मराठवाडा कनेक्टिव्हिटी वाढणार आहे. याचा विदर्भाला मोठ्या प्रमाणात फायदा होईल. बुलेट ट्रेन, कॉरिडोर, रेल्वे स्टेशन पुनर्विकास, नव्या मार्गिका तयार करण्यात येणार आहेत.

- महाराष्ट्रातील ५.५ लाख महिला बचत गटांना ८२५ कोटी रुपयांचा फिरता निधी.
- पीएम किसान सन्मान निधी अंतर्गत देशातील ११ कोटी शेतकऱ्यांना ३ लाख कोटी रुपये मिळाले आहेत. यापैकी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सुमारे ३२ हजार कोटी रुपये मिळाले.
- २६ प्रलंबित सिंचन प्रकल्प महाराष्ट्रातील होते, त्यापैकी १२ प्रकल्प सरकारने पूर्ण केले आहेत आणि इतर प्रकल्पांवरही काम सुरू. ५० वर्षांनंतर पूर्ण झालेला निळवंडे धरण प्रकल्प, कृष्णा कोयना आणि टेंभू प्रकल्प आणि गोसीखुर्द प्रकल्पाला मोदी सरकारकडून अर्थसहाय्य.
- पंतप्रधान कृषी सिंचाई आणि बळीराजा संजीवनी योजनेंतर्गत विदर्भ आणि मराठवाड्याला फेब्रुवारी २०२४ मध्ये ५१ प्रकल्प समर्पित करण्यात आले.
- इतर मागासवर्गीयांच्या(ओबीसी) कुटुंबांसाठी घरांची योजना सुरू झाली असून महाराष्ट्रातील १० हजार ओबीसी कुटुंबांना त्यामुळे पक्की घरे मिळतील.
- मोदी सरकारने मुंबईमधील जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी (JNP) पोर्ट, पागोटे आणि चौक दरम्यान सहा–लेन एक्सप्रेसवे उभारण्याचा निर्णय घेतला आहे
- नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आधुनिकीकरणासाठी ७ हजार ७०० कोटींचा निधी.
- २२१ किलोमीटर लांबीचा ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग–आळंदी ते पंढरपूर, ७ हजार कोटी रु. खर्च, १३० किलोमीटर लांबीच्या देहू–पंढरपूर संत तुकाराम महाराज पालखी महामार्गासाठी ५ हजार कोटींचा खर्च.
- पंतप्रधान आवास योजना: २५ लाख घरे.
- ७१ लाख गरिबांना आयुष्मान भारत योजनेचा लाभ.
- १.१० कोटी शेतकऱ्यांना किसान सन्मान निधी योजना लाभ.
- १ कोटी ११ लाख ७४ हजार ८५८ घरांमध्ये जलजीवन मिशनमुळे नळ जोडणी.
- ३८.९० लाख भगिनींना पंतप्रधान उज्वला योजनेचा लाभ.
- कौशल विकास योजनेतून १० लाख २७ हजार युवकांना फायदा.
- ८७.८९ लाख शेतकऱ्यांना पंतप्रधान पीक विमा योजनेतून लाभ.
- ५ लाख फुटपाथ व्यावसायिकांना, फेरीवाल्यांना स्वनिधी योजनेतून लाभ.
- मुद्रा योजना: ४१ लाख युवांना लाभ.
- अटल पेन्शन: ४० लाख लोकांना लाभ.
- सुकन्या समृद्धी योजना: २३.१३ लाख लाभान्वित.
- दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना: ५० हजार ६०० लाभान्वित.
- पंतप्रधान मातृवंदन योजना ३२.२५ लाख लाभान्वित.
- ४ लाख कोटी रुपयांहून अधिकची पायाभूत सुविधांची कामे केंद्राच्या मदतीने सुरू. ■

# जनतेने ज्यांना नाकारले, ते जनादेशाला नाकारतात!

● देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

**गडचिरोलीतून** ७ जूनला सकाळी नागपूरकडे परतताना मला पत्रकारांनी राहुल गांधी यांनी एक लेख लिहिल्याचे निदर्शनास आणून दिले. मी त्यांना म्हणालो, कशावर लिहिला आहे? ते म्हणाले, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक! खरे तर हा विषय उगाळून आता जुना झाला. निवडणूक आयोगाने तर वेळोवेळी त्याला उत्तरेही दिली. ती उत्तरे न वाचताच त्यांना लेखक होण्याची खुमखुमी आली असेल, तर माझ्या त्यांना शुभेच्छा! पण, त्याचवेळी एक न मागितलेला सल्लाही एकदा पराभव स्वीकारून आपण कुठे चुकतो आहोत, जनतेशी आपला कनेक्ट कुठे कमी पडतो, त्यासाठी काय केले पाहिजे, याचा विचार केला तर ते अधिक सयुक्तिक ठरेल. बाकी या लेखाला अनुल्लेखानेच उत्तर द्यायला हवे. पण, एक तत्त्व आहे, तुम्ही लोकांना 'कन्व्हीन्स' करू शकत नसाल, तर त्यांना 'कन्फ्यूज' करा. तेच काम राहुल गांधी वारंवार करीत आहेत. त्यामुळे वस्तुस्थिती तितक्याच वेळा जनतेपुढे आणणे हेही काम आपल्याला करत राहावे लागेल. अर्थात बिहारसह आगामी विधानसभा निवडणुकांच्या पराभवाची कारणेही त्यांना आतापासून तयार करायची आहेत, हा भाग वेगळा.

असो, महाराष्ट्रातील निवडणुकीचा जोवर प्रश्न आहे, तर ही निवडणूक मुळात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी नव्हती, तर त्यात आणखी एक घटक होता, तो म्हणजे भारत जोडो अभियान. 'जोडो'च्या नावाखाली स्थापन झालेले हे 'तोडो' अभियान काय करीत होते, तर देशातील सर्व संवैधानिक संस्थांच्या विरोधात जनमानसात गैरसमज निर्माण करणे, पर्यायाने त्यांना देशाविरुद्धच लढण्यास उद्युक्त करणे. मग ते सुप्रीम कोर्ट असेल, निवडणूक आयोग असेल. या 'भारत जोडो'मध्ये कोणत्या संघटना होत्या आणि त्यातील किती संघटनांना डॉ. मनमोहन सिंग यांनी २०१२ मध्ये शहरी नक्षलवादाच्या यादीत टाकले होते, यावर अतिशय सविस्तर भाषण मी



महाराष्ट्राच्या विधानसभेत १९ डिसेंबर २०२४ रोजी केले होते. राहुल गांधी यांनी ते जरूर ऐकावे, म्हणजे तुमच्या लेखातील पहिल्या टप्प्याचे उत्तर तुम्हाला आपसूकच मिळेल. १९५० पासून नवीन कायदा अस्तित्वात येईस्तोवर मुख्य निवडणूक आयुक्त तुमच्या काँग्रेस सरकारने थेट नियुक्त केले. आतापर्यंतच्या २६ पैकी २५ आयुक्त केंद्राने थेट नेमले. पहिल्यांदा मोदीजींनी त्यात विरोधी पक्षनेता किंवा सर्वांत मोठ्या राजकीय पक्षाचा नेता असलेली समिती नियुक्त केली. पण, लोकशाहीला भक्कम करणारे आणि तुमच्या काळात कधीही पाळले न गेलेले पाऊल तुम्हाला आवडलेले दिसत नाही.

## दुसरा टप्पा : मतदारवाढीचा!

राहुल गांधींचा दुसरा आक्षेप मतदार संख्यावाढीचा. ज्याला ते बोगस मतदार म्हणतात. ५ वर्षांत ३१ लाख मतदार वाढले हा त्यांचा आक्षेप आहे. पुढे ५ महिन्यांत ४१ लाख वाढले, असेही ते म्हणतात. युवा मतदारांची संख्या ही सातत्याने वाढत असते. या ४०,८१,२२९ मतदारांपैकी २६,४६,६०८ मतदार हे युवा मतदार होते. नवीन मतदारांची नोंदणी, त्या प्रक्रियेत राजकीय पक्षांचा सहभाग, त्यावरील सुनावणीची पद्धत याबाबत निवडणूक आयोगाने

२४ डिसेंबर २०२४ रोजी आपल्या पक्षाच्या विधि, मानवाधिकार आणि आरटीआय विभागाचे वकील ओमर हूडा यांना सविस्तर ६० पानांचे पत्र पाठविले आहे, त्यात सर्व प्रश्नांचे निराकरण करण्यात आले आहे. ते आपल्यापर्यंत पोहोचले नसेल तर एकदा मागवून आवर्जून वाचावे. शिवाय जुनाही काही तपशील वाचावा. २०१४ ते २०१९ या काळात ६३ लाख नवीन मतदार, २००९ ते २०१४ या काळात ७५ लाख नवीन मतदार, २००४ ते २००९ या काळात एक कोटी नवीन मतदार जोडले गेले आहेत. म्हणजे २०२४ मध्ये काहीतरी दिव्य घडले, असे अजिबात नाही. लोकसभा आणि विधानसभा या दोन निवडणुकांदरम्यान किती मतदार वाढले ही आकडेवारीसुद्धा हवी असेल तर २००४ : लोकसभेपेक्षा विधानसभेत ५ टक्के अधिक. २००९ मध्ये ४ टक्के अधिक, २०१४ मध्ये ३ टक्के अधिक, २०१९ मध्ये १ टक्का अधिक, २०२४ मध्ये ४ टक्के अधिक आहे. त्यामुळे पुन्हा २०२४ मध्ये काहीही नवीन घडले असे नाही.

### तिसरा टप्पा : अधिक मतदानाचा !

मतदानाची टक्केवारी अचानक वाढली, हा तर फारच मोठा विनोद आहे. शेवटच्या तासात टक्केवारी कशी वाढली, हे समजून घ्यायचे असेल तर ताशी मतदान समजून घ्यावे लागेल. दिवसभर झालेल्या एकूण मतदानाची टक्केवारी पाहिली तर प्रतितास सरासरी ५.८३ टक्के इतके मतदान झाले आहे. त्यामुळे शेवटच्या एक तासात ७.८३ टक्के इतकी वाढ झाली आहे, असे सांगून आपण काय नवीन सांगतो आहात? सायं. ५ ते ६ हीसुद्धा मतदानाची वेळ आहे आणि ६ पर्यंत बुथवर आलेल्या प्रत्येकाला मतदानाचा हक्क बजावता येतो, ही बाब राहुल गांधींना माहिती नाही काय? यावरही एक सविस्तर लेख 'लोकसत्ता'मध्येच माझ्या कार्यालयाकडून ३ डिसेंबर २०२४ रोजी लिहिण्यात आला होता. तोही वाचला असता, तर कदाचित इतका लेखनप्रपंच राहुल गांधी यांना आज करावा लागला नसता. शिवाय, असे काही महाराष्ट्रातच झाले असे नाही. २०२४ च्या लोकसभेच्या दुसऱ्या टप्प्यात सायं. ५ वाजता दिलेली मतदानाची आकडेवारी ६०.९६ टक्के इतकी होती, जी दुसऱ्या दिवशी ६६.७१ टक्के इतकी अंतिम झाली. यातील वाढ ५.७५ टक्के इतकी होती. पण, ती निवडणूक तुम्ही जिंकलात म्हणून लपवून ठेवणार का? आधी रात्री उशिरापर्यंत मतदानाची अंतिम आकडेवारी यायची, आता ती ५ वाजता येऊन दुसऱ्या दिवशी अंतिम आकडेवारी येते.

### चौथा टप्पा : अर्धवटपणाचा

यात राहुल गांधी यांचे म्हणणे आहे की, केवळ ८५ मतदारसंघात १२ हजार मतदान केंद्रांवर वाढीव मतदारांची संख्या होती आणि यापैकी बहुतेक जागा एनडीएच्या पारड्यात गेल्या. याचाही हिशेब ३ डिसेंबर २०२४ च्या 'लोकसत्ता'तील लेखात आहे. सायंकाळी ६ नंतर झालेले मतदान हे १७ लाख ७० हजार ८६७ इतके आहे. दिवसभराच्या मतदानाच्या सरासरीनुसार, एक लाख ४२७ मतदान केंद्रांवर प्रतिमिनिट ९७,१०३.३२ इतके मतदान झाले आहे. त्यामुळे जे मतदान सायंकाळी ६ नंतर झाले आहे, त्याची सरासरी काढली तर अतिरिक्त लागलेला वेळ हा केवळ १८ मिनिटे २३ सेकंद इतका आहे. ज्या मतदारसंघात शेवटच्या क्षणी मतदान टक्केवारीत वाढ झाली तेथे एनडीएच जिंकली, हे तर आणखी हास्यास्पद आहे. कामठीचे उदाहरण त्यांनी दिले. पण जे उदाहरण त्यांनी दिले नाही, ते मी येथे देतो आहे. माढ्यात १८ टक्के वाढ, जेथे शरद पवार गटाचा उमेदवार जिंकला, वणीत १३ टक्के वाढ जेथे उद्धव ठाकरे गटाचा उमेदवार जिंकला, श्रीरामपूर येथे १२ टक्के वाढ जेथे काँग्रेस जिंकली आहे.

### पाचवा अर्थहीन मुद्दा

राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगासंबंधी काही पुराव्यांचे मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यावर निवडणूक आयोग उत्तर देईलच. पण, मुख्य प्रश्न आहे, तो सातत्याने लोकशाही प्रक्रियेचा अपमान करण्याचा, सातत्याने जनादेशाचा अपमान करण्याचा. जनतेने राहुल गांधींना नाकारले, त्याचा बदला म्हणून ते जनतेला नाकारत आहेत. यातून काँग्रेस पक्ष आणखी गर्तेत जाणार आहे. आपल्याच पक्षाचे आमदार राहुल गांधी यांची एक दिवसात भेट घेऊन दाखवा, अशी विधाने का करतात, यावर त्यांनी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. सातत्याने लोकशाही प्रक्रियेवर आणि संवैधानिक संस्थांवर शंका उपस्थित करून आपण देशाला कोणत्या दिशेने घेऊन जात आहोत, कोणते विष कालवत आहोत, याचे भान ठेवले पाहिजे. ■

# पक्षभेदा पलिकडची व्यापक राष्ट्रनिती



> पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याला उत्तर देण्यासाठी भारतीय लष्कराने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी अड्ड्यांना लक्ष्य करत 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी केले. तेवढ्यावर न थांबता पाकिस्तानबरोबर १९६० च्या दशकात केलेला 'सिंधू जल करार' स्थगित केला. 'ऑपरेशन सिंदूर'ला उत्तर म्हणून पाकिस्तानने भारतावर क्षेपणास्त्र हल्ल्याचे अनेक प्रयत्न एकाचवेळी केले. हे सर्व हल्ले भारताच्या क्षेपणास्त्र विरोधी प्रणालीने निकामी ठरवले. त्याला उत्तर देताना भारताने पाकिस्तानच्या काही हवाईतळांवर हल्ला चढवला.

**पाकिस्तानच्या** राज्यकर्त्यांना आणि लष्करशहांना धडा शिकवण्यासाठी भारताने मर्यादित स्वरूपाची लष्करे कारवाई केली. या कारवाईनंतर मोदी सरकारने सर्वपक्षीय खासदारांचे तसेच माजी राजदूत, राजनितिज्ञ मंडळींचे शिष्टमंडळ विविध देशांना पाठवण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे ५९ जणांचे शिष्टमंडळ ३२ देशांमध्ये जाऊन आले. पहलगाम हल्ल्याशी पाकिस्तानचा असणारा थेट संबंध, ऑपरेशन सिंदूरमध्ये कोणते दहशतवादी तळ उद्धवस्त केले आणि त्यानंतर पाकिस्तानच्या कोणत्या लष्करी स्थानांवर हवाई हल्ले केले, याबाबतची माहिती या शिष्टमंडळाने विविध देशांना दिली. हे शिष्टमंडळ नुकतेच भारतात परतले. कणखर लष्करी धोरणांबरोबरच कूटनितीमध्येही भारत कोठे कमी पडू नये, यासाठी मोदी सरकारने सर्वपक्षीय शिष्टमंडळ पाठवण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रहिताच्या व्यापक दृष्टीकोनातून पक्षीय मतभेद विसरत सर्वपक्षीय खासदार आपल्या मायभूमीची बाजू अभिमानाने आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मांडत होते. ही घटना मोदी सरकारच्या परिपक्व परराष्ट्र धोरणाची साक्ष देणारी ठरली. अनेक मुद्यांवर मोदी सरकार आणि भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वावर प्रखर टीका करणारे 'एमआयएम'चे ओवैसी, काँग्रेसचे सलमान खुर्शीद, आनंद शर्मा, मनिष तिवारी, सुप्रिया सुळे, कनिमोळी, यासारख्या खासदारांनी या शिष्टमंडळाचे प्रतिनिधिव करत भारताची बाजू जगासमोर अत्यंत प्रभावीपणे मांडली. माजी परराष्ट्र मंत्री आणि काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी या शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा गाढा अभ्यास असणाऱ्या थरूर यांच्याकडे या शिष्टमंडळाचे नेतृत्व सोपविताना मोदी सरकारने आपला 'राष्ट्रहित सर्वोपरी'







दृष्टीकोन दाखवून दिला. या शिष्टमंडळावरून संकोचित राजकारणाचे प्रयोग काही मंडळींनी केले. मात्र या संदर्भातील जनमतात असलेल्या संतप्त भावना लक्षात आल्यानंतर या मंडळींनी आपले प्रयोग फार लांबवले नाहीत. वास्तविक सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात या मुद्द्यावर एकमत असताना काही पक्षांनी शिष्टमंडळाच्या रचनेवरून राजकीय अभिनिवेशाचे प्रदर्शन घडविण्याचे कारण नव्हते. या शिष्टमंडळांमध्ये सहभागी होण्यासाठी काँग्रेसने चार पक्ष सदस्यांची नावे सुचविली होती. त्यांतील आनंद शर्मा वगळता सरकारने अन्य तिघांना स्थान दिले नाही. त्याऐवजी शशी थरूर यांना एका शिष्टमंडळाचे प्रमुख नेमले. त्यावरून काँग्रेसने चिडचिड केली. आंतराष्ट्रीय स्तरावरील मुत्सद्देगिरीबाबत अनुभव मोठा आहे. काँग्रेसने थरूर यांचे नाव स्वत:हून सरकारला सुचवायला हवे होते. मात्र थरूर यांच्या नावाला पक्षातील काही मंडळींनी विरोध केल्यामुळे काँग्रेसने शर्मा यांचे नाव पाठवले. अशा प्रसंगामध्ये पक्षीय राजकारणासारखी संकुचित भूमिका घेऊ नये, याचे भान काँग्रेस नेतृत्वाला ठेवता आले नाही. काँग्रसचे नेतृत्व करणारे लोकसभेतील नेतेपद भूषविणारे राहुल गांधी यांनी 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताची किती विमाने पडली, हे सरकारने जाहीर करावे, अशी मागणी केली होती. यावरूनच राहुल गांधींच्या उथळपणाला अजून उतार पडलेला नाही, हे दिसले. अशी मागणी करून आपण आपल्याच देशाची आंतरराष्ट्रीय स्तरावर बदनामी करत आहोत, हे कळण्याएवढे शहाणपण राहुल गांधींकडे केव्हा येणार, याची काँग्रेसजनानांही प्रतिक्षा आहे. या भूमिकेमुळेच काँग्रेसने थरूर यांच्याकडे शिष्टमंडळाचे नेतत्व सोपविल्यानंतर जाहीररित्या आदळआपट केली. मोदी सरकारने या शिष्टमंडळात फक्त भाजपा आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) खासदारांना स्थान दिले असते तर काँग्रेसचा विरोध समजू शकला असता. तसे काही झाले नसताना शिष्टमंडळाच्या मुद्यावरून काँग्रेस नेतृत्वाने मोदी सरकारवर अकारण दोषारोप केले. सरकारने केवळ भाजपा आणि मित्रपक्षांच्याच सदस्यांना शिष्टमंडळांत स्थान दिले असते तर तक्रारीला वाव होता. पण तसे काही घडलेले नाही. तेव्हा काँग्रेसने थरूर यांच्या समावेशावरून इतका थयथयाट करण्याचे कारण नव्हते. यातून काँग्रेस पक्षाचे हसे झाले. थरूर हे मोदी सरकारची 'ऑपरेशन सिंदूर' नंतर वेगवेगळ्या व्यासपीठांवर मोकळ्या







मनाने प्रशंसा करत असतात. त्याबद्दलही काही काँग्रेस नेत्यांनी थरूर यांच्याबद्दल तक्रारी केल्या. असो.

एकीकडे राहुल गांधी हे भारताची किती विमाने पडली, यासारखे प्रश्न विचारत असताना दुसरीकडे सर्वपक्षीय शिष्टमंडळाला मोकळ्या मनाने पाठिंबा देण्याचा उदारपणा दाखवतील, अशी अपेक्षा नव्हतीच. राहुल गांधींच्या या भूमिकेचे अपेक्षेप्रमाणे पाकिस्तानमध्ये जोरदार स्वागत झाले. हाफिज सईदसारख्या अतिरेक्यांच्या म्होरक्याने राहुल गांधींवर स्तुतीसुमने ओवाळली. युद्ध विरामाचा निर्णय भारताने पाकिस्तानकडून प्रस्ताव आल्यानंतर घेतला होता. त्याचेही राजकारण करण्याचा प्रयत्न राहुलबाबांनी केला. भारताच्या हल्ल्यामुळे आपल्या कोण-कोणत्या लष्करी तळांची हानी झाली, याची माहिती खुद्द पाकिस्तान सरकारनेच दिली आहे. भारतीय विमाने पाडल्याचा दावा करणाऱ्या पाकिस्तानला त्याबाबतचा एक पुरावाही सादर करता आलेला नाही, ही वस्तुस्थिती असताना राहुल गांधी भारताची किती विमाने पडली, हेच तुणतुणे वाजवत राहिले. यातून राहुलबाबांची राजकारणातील कालबाह्यता दिवसेंदिवस ठळक होत चालली आहे. ■

# संघटन पर्व : विचार, बांधिलकी आणि कार्यकर्त्यांचा संगम




● राजेश पांडे, प्रदेश सरचिटणीस

> भाजपाचा खरा पाया संघटन आहे आणि हे संघटन उभारणीत सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा असलेला महत्त्वपूर्ण सहभाग हीच पक्षाची खरी ओळख आहे. कार्यकर्ता हा भाजपाचा आत्मा आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही, कारण पक्षाच्या प्रत्येक उपक्रमात आणि यशात दिसणारी खरीखुरी भावना ही कार्यकर्त्यांच्या प्रत्येक कृतीतून स्पष्टपणे दिसून येते.

**लोकसभा** आणि विधानसभा निवडणुकीनंतर लगेचच आयोजित करण्यात आलेल्या संघटन पर्वाच्या निमित्ताने महाराष्ट्रात दीड कोटी प्राथमिक सदस्यांची नोंदणी पूर्ण होणे, ही अतिशय अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. भाजपाची महाराष्ट्रातील जनमानसातील वाढती स्वीकृती आणि संघटनेची सशक्त रचना याचे हे जिवंत उदाहरण आहे. आपल्या सर्वांचे मार्गदर्शक आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे रणनीतिक मार्गदर्शन आणि प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे प्रचंड परिश्रम व नियोजन यांच्या त्रिसूत्रीने हे भव्य अभियान यशस्वीपणे पार पडले. महाराष्ट्रातील चांद्यापासून बांद्यापर्यंतच्या प्रत्येक भागात, प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक शहरात, प्रत्येक गावात पोहोचून कार्यकर्त्यांनी हे करून दाखवले आहे. अभियानाच्या माध्यमातून गावागावात भाजपाचे मजबूत संघटन उभे राहिले. त्यामुळे या ऐतिहासिक अभियानाचा साक्षीदार असल्याचा अभिमान वाटतो.

भाजपाच्या दीड कोटी प्राथमिक सदस्य नोंदणीच्या ऐतिहासिक यशामागे केवळ तांत्रिक यंत्रणा किंवा मोहीम नसून, संघटनशक्ती, टीमवर्क आणि सातत्यपूर्ण संवादाचे हे फलित आहे. या अभियानात अनेक जबाबदार पदाधिकाऱ्यांनी आपल्या भूमिकेचे प्रामाणिक आणि प्रभावी पालन करत महाराष्ट्रात जनसंवादाचा भक्कम पाया रचला. या अभियानाचे प्रभारी असलेले राष्ट्रीय महासचिव श्री

अरुण सिंहजी यांनी 'संघटन पर्व' या व्यापक उपक्रमाला भक्कम उर्जा दिली. महाराष्ट्रभर दौरे करत कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून, आत्मविश्वास वाढवून, सदस्यता नोंदणीला गती दिली. राष्ट्रीय सहसंघटन मंत्री श्री. शिवप्रकाशजी यांनी सदस्यता अभियानाच्या काळात सतत पाठपुरावा, कार्यकर्त्यांशी संवाद, आणि महाराष्ट्रातील विविध भागांत प्रवास करत संघटन शिस्त मजबूत केली. त्यांनी संपूर्ण अभियानात सक्रिय मार्गदर्शन करत राज्य पातळीवरील संघटन क्रियांना दिशा दिली.

त्याचप्रमाणे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन दौरे केले, कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेतल्या, स्थानिक संघटन पातळीवर झालेल्या कार्याचा आढावा घेतला. या सलग दौऱ्यांमुळे कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावले आणि प्रत्येक बूथपर्यंत पक्षाची ताकद पोहोचली. तसेच, रवींद्र चव्हाण यांनी सलग एक महिना जिल्हाध्यक्षांसोबत ऑनलाईन बैठका घेण्याचे नियोजन केले. या बैठकींमधून सदस्य नोंदणीतील प्रगती, अडचणी आणि उपायांवर चर्चा करून, स्थानिक नेतृत्वाला वेळोवेळी मार्गदर्शन केले. या सगळ्याचा परिपाक म्हणून महाराष्ट्र भाजपा दीड कोटी प्राथमिक सदस्य संख्या नोंदवू शकली.

आदरणीय नरेंद्र मोदीजींच्या सक्षम नेतृत्वावरील देशवासियांचा विश्वास अधिकाधिक दृढ होत आहे. हा विश्वास केवळ केंद्र सरकारवर नाही, तर भारतीय जनता पक्षाच्या कार्यपद्धतीवर देखील आहे. पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता हा 'राष्ट्र प्रथम' या विचारधारेचा जणू एक प्रसारक बनला आहे. यामुळेच आज भाजपा ही केवळ एक राजकीय संघटना न राहता, सर्वसामान्यांना आपली वाटणारी, लोकांच्या आशा-आकांक्षांशी जोडलेली एक सामाजिक चळवळ बनली आहे. या सामाजिक चळवळीमधूनच 'विश्वगुरु भारत' या संकल्पनेला बळ मिळत आहे.

सुशासन, सेवा आणि सशक्त नेतृत्वाच्या माध्यमातून भारत केवळ प्रगत देश न राहता, वैचारिक आणि नैतिक दिशादर्शक म्हणून जागतिक मंचावर पुन्हा उभा राहत आहे आणि या परिवर्तनामध्ये भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्याचा मोलाचा वाटा आहे. मागील ११ वर्षांत भारतात आर्थिक स्थैर्य, महिला सशक्तीकरण, डिजिटल वाढ, ग्रामीण विकास, युवा सक्षमीकरण आणि पायाभूत सुविधांच्या निर्मितीला मिळालेली गती या सर्व बाबींमध्ये अभूतपूर्व प्रगती झाली. 'विकसित भारत २०४७' आणि आत्ता सुरु असलेला अमृतकाल, यात स्वतःची वेगळी आणि महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी प्रत्येक भारतीय स्वतःचे योगदान देऊ पाहत आहे, आणि भाजपाचा सदस्य होऊन या व्यापक जनआंदोलनाचा भाग होत आहे.

'संघटन पर्व' अंतर्गत सदस्यता नोंदणी करत असताना प्राथमिक सदस्य, सक्रिय सदस्य, आणि कार्यकारिणी सदस्य अशी नोंदणी झाली. प्राथमिक सदस्यता घेणाऱ्या नागरिकांचा यावेळी वाढता प्रतिसाद दिसत असला तरी, पुढे जावून सक्रिय सदस्य आणि बूथ पातळीवरील संघटनात्मक बांधणीचा पाया देखील अधिक मजबूत झाला आहे. तसेच यानिमित्ताने बूथ कमिट्यांचे गठण, कार्यशाळा, बैठका, नियोजन आढावा या सर्व उपक्रमांनी पक्षातील संवाद, बांधिलकी आणि कार्यक्षमतेला नवे बळ मिळाले आहे.

भाजपाचे सदस्यता नोंदणी अभियान केवळ सदस्य संख्या वाढवण्याचे कार्य नव्हते, तर हे एक जनसंवादाचे माध्यम देखील होते. जनता आणि पक्ष यांच्यातील नातं घट्ट करणारा एक उत्तम प्रयत्न होता. ८८००००२०२४ या क्रमांकावर मिस्डकॉल देऊन कोणीही सहज भाजपाचा सदस्य बनू शकतो. ही माहिती प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी सोशल मीडियावर आणि गावागावात कार्यकर्त्यांनी खूप मेहनत घेतली. याची फलश्रुति म्हणून महाराष्ट्रात अगदी कमी कालावधीत विक्रमी १.५० कोटीपेक्षा जास्त प्राथमिक सदस्य नोंदणी झाली.

भाजपासाठी प्रत्येक सदस्य हा देशासाठी काम करणारा एक समर्पित कार्यकर्ता आहे. या यशामागे देशसेवा करणारी कार्यकर्त्यांची प्रेरणा, जिद्द आणि पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांच्या सुशासन काळातील विकास-कल्याणाचे दर्शन हे प्रमुख घटक आहेत. पक्ष संघटनेने मागील दशकात एका सामाजिक-राजकीय चळवळीचा निर्विवाद आरंभ केला आहे, ज्यामुळे आज देशभक्तीने प्रेरित प्रत्येक व्यक्तीस भाजपामध्ये सहभागी होण्यासाठी उत्सुक आहे. त्याचप्रमाणे जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून भाजपाची ओळख निर्माण झाली आहे. या साऱ्यांचे मूळ संघटनात्मक शिस्त, कार्यकर्त्यांचा निष्ठावान सहभाग आणि राष्ट्र हिताच्या विचारात आहे. संघटन पर्व काळात पक्ष संघटनेसाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला माझ्या शुभेच्छा आहेत. ■

# गुंतवणुकीत महाराष्ट्र अव्वल!

**महाराष्ट्रात** २०२४-२५ या आर्थिक वर्षात एक लाख ६४ हजार ८७५ कोटी रुपये एवढी विक्रमी थेट विदेशी गुंतवणूक आली आहे. महाराष्ट्र थेट विदेश गुंतवणुकीत देशात पुन्हा अव्वल ठरला आहे. गेल्या तीन वर्षांत महायुती सरकारने घेतलेल्या निर्णयांवर, आखलेल्या धोरणांवर परदेशी गुंतवणूकदारांनी भरभरून विश्वास दाखविला असल्याचे यातून सिद्ध झाले आहे.

२०२४-२५ या आर्थिक वर्षात संपूर्ण देशात चार लाख २१ हजार ९२९ कोटी एवढी थेट विदेशी गुंतवणूक आली. त्यापैकी ४० टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत थेट विदेशी गुंतवणुकीत थोडी थोडकी नव्हे तर ३२ टक्क्यांची घशघशीत वाढ झाली आहे. यापैकी जानेवारी ते मार्च २०२५ या अखेरच्या तिमाहीत २५ हजार ४४१ कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात झाली. गेल्या १० वर्षांतील सर्वाधिक विदेशी गुंतवणुकीचा नवा विक्रम महाराष्ट्राने केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कारकीर्दीतील हा अभिमानाचा क्षण आहे. २०१४ पासून देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकसित महाराष्ट्राची घोडदौड मोठ्या तडफेने सुरू झाली आहे.

२०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या काळात महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची पायाभरणी झाली. मेट्रो, समृद्धी महामार्ग, नदीजोड प्रकल्प, जलयुक्त शिवार यासारख्या अनेक प्रकल्पांतून राज्याच्या समृद्ध विकासाचे संकल्प चित्र रेखाटण्यात आले आहे. फक्त मुंबई महानगर क्षेत्रातील (एमएमआरडीए) ३३७ किलोमीटर लांबीच्या मेट्रोसाठी एक लाख ४८ हजार ३८० कोटी खर्चाचे प्रकल्प सुरू झाले आहेत. १९ हजार ६०० कोटी रुपये एवढ्या खर्चाचा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, ७६ हजार २२० कोटी रुपये खर्चाचा वाढवण बंदर प्रकल्प, अटल सेतू, कोस्टल रोड यासारखे अनेक प्रकल्प २०१४ पासून राज्यात सुरू आहेत.

राज्याच्या भविष्यकालीन गरजांचा विचार करून फडणवीस सरकारने अनेक निर्णय घेतले आहेत. छतावरील सौरऊर्जा वापरासाठी सौरऊर्जा अनुदान योजना, संपूर्ण राज्यात १५०० किलोमीटर लांबीच्या नवीन रस्त्यांची निर्मिती मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्ग, शक्तिपीठ महामार्ग, नार-पार गिरणा नदीजोड प्रकल्प, वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प यासारख्या प्रकल्पांतून फडणवीस सरकारने विकासाच्या भविष्यवेधी दृष्टीचे दर्शन घडविले.

२०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांनी विश्वासघात करत महाविकास आघाडीची निर्मिती केली. जुलै २०२२ पर्यंत म्हणजे अडीच वर्षांच्या कालखंडात देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केलेल्या अनेक विकास योजनांना स्थगिती देत उद्धव ठाकरे यांनी आपला विकासविरोधी चेहरा आणि भाजप विरोधाची विखारी मळमळ दाखवून दिली. महाराष्ट्राच्या जनतेच्या दृष्टीने उद्धव ठाकरेंच्या सरकारची अडीच वर्षे महाराष्ट्राला विकासाच्या बाबतीत २० वर्षे मागे नेणारी ठरली. जुलै २०२२ मध्ये भाजप-शिवसेनेचे महायुतीचे सरकार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सत्तारूढ झाले आणि राज्याच्या विकासाला पुन्हा वेग मिळाला. उद्धव ठाकरे यांच्या नाकर्तेपणामुळे एअर बस, फॉक्स कॉन यासारखे गुंतवणुकीचे अनेक प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेले. वेदांताचा सेमी कंडक्टर प्रकल्पही उद्धव ठाकरेंच्या निष्क्रियतेमुळे महाराष्ट्राबाहेर गेला. उद्धव ठाकरेंच्या अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात देवेंद्र फडणवीस सरकारच्या पूर्वीच्या विकास योजनांना स्थगिती देण्याचा सपाटा लावला गेला. मुंबई मेट्रोचा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प उद्धव ठाकरेंनी सूडबुद्धीमुळे रोखला.

टाटा एअर बसचा प्रकल्प नागपूर येथे सुरू करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी २०१७ पासून प्रयत्न सुरू केले होते. मुख्यमंत्री झाल्यावर उद्धव ठाकरे यांनी गुंतवणुकीच्या प्रकल्पांसाठी आवश्यक असणारा पाठपुरावा केलाच नाही. घरात बसून फेसबुक लाइव्हद्वारे राज्य कारभार करणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी महायुती सरकारविरोधात अपप्रचाराची मोहीमच उघडली होती. या मोहिमेला राज्याच्या जनतेने विधानसभा निवडणुकीत सणसणीत चपराक लगावली. देशातील गुंतवणूकदारांना आवश्यक असणाऱ्या सुविधा त्वरेने देणारे सरकार सत्तेत असले तर काय घडते, हेच महायुती सरकारने दाखवून दिले आहे. गुंतवणूकदारांना जमीन, पाणी, वीज यांसारख्या सुविधा तसेच आवश्यक असणारे परवाने जलदगतीने देणाऱ्या सरकारवरच गुंतवणूकदार विश्वास ठेवतात. ■




नांदेड– खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या जनसंपर्क केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन– उपस्थिती– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री अतुल सावे, आ. तुषार राठोड, आ. राजेश पवार, आ.भीमराव केराम, आ. श्रीजया चव्हाण, आ. जितेश अंतापूरकर आदी.

## वैशिष्ट्यपूर्ण अंत्योदय जनसंपर्क कार्यालय

**खा. गोपछडे** यांच्या चार मजली अंत्योदय कार्यालयात जनकल्याणासाठी अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तळ मजल्यावर राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती देणारे कक्ष, शिवाय याच ठिकाणी त्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी योग्य सल्ला व मार्गदर्शन केले जाणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि पंतप्रधान सहाय्यता निधीसाठीचे अर्ज स्वीकारणे आणि त्यासाठी येणाऱ्या नागरिकांना सहकार्य करणे यासाठी येथे सेवा दिली जाणार आहे. या विभागाला जनसेवा विभाग असे नाव देण्यात आले आहे. पहिल्या माळ्यावर संघटनात्मक कार्यक्रमांसाठी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. पक्षाच्या बैठका, परिसंवाद कक्ष पक्षाचे पत्रकार परिषदा याठिकाणी होणार आहेत. याच माळ्यावर अद्ययावत ग्रंथालय असून दुसऱ्या माळ्यावर सोशल मीडिया कक्ष आहे. या ठिकाणी पक्षाच्या पत्रकार परिषदा होतील. चौथ्या माळ्यावर वॉर रूम असून या ठिकाणी सर्व प्रकारच्या निवडणुका संबंधित कामकाज चालणार आहे. तसेच कोणत्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीमध्ये नागरिकांना २४ तास सेवा देण्यासाठी आपतकालिन कक्षही याठिकाणी काम करणार आहे.

## जिल्हाध्यक्ष सुनील केदार यांचा लोककलावंतांतर्फे सत्कार...

**नाशिक** जिल्ह्यातील तमाशा कलावंत, जागरण गोंधळी, भारुड, भजनी अशा विविध प्रकारच्या लोककलावंतांनी जिल्हा अध्यक्ष सुनिल केदार यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी मराठी शाहीर व मराठी लोक कलावंत परिषदेच्या नंदा पुणेकर व परिषदेचे अध्यक्ष विशाल कांबळे, ज्ञानेश्वर वाघमारे यांनी सत्कारापूर्वी स्फूर्ती गीत म्हणून स्वागत केले. यावेळी राज्य शासनाद्वारे चालविण्यात येणाऱ्या राजश्री शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजने अंतर्गत जिल्ह्यात मिळणारे मानधन कलावंतांना मिळण्यासाठी संबंधित विभागात पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन सत्कार प्रसंगी केदार यांनी कलावंतांना दिले. या सत्काराप्रसंगी दिनकर घोरपडे, के.एल शिंदे, दगडू सांबरे, तानाजी भालेराव, त्रंबक सायाळे, मुरली बाबा कडभाणे, विष्णू पवार, चंदू शिंदे, मीनानाथ डावरे, काळू साबळे, संदेश जाधव आदींसह जिल्ह्यातील लोककलावंत उपस्थित होते. ■



खोपोली– माजी नगरसेवक अविनाश तावडे, यशवंतशेठ साबळे, सुहास वझरकर, मंगेश सुर्वे, विक्रम साबळे, अजिंक्य तावडे, दिलीप देशमुख, भिमा मोरे, इरशाद खान, चिराग रावल, अतुल पवार, महेंद्र खोत यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, खा. धैर्यशील पाटील, आ. प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, दिपक बेहेरे, अश्विनी पाटील, अतुल बडगुजर आदी.




सिंधुदुर्ग– ११ वर्षाच्या कार्यकाळाचे दर्शन घडवणाऱ्या प्रदर्शनाचे उद्घाटन– उपस्थिती– मत्स्य व्यावसाय व बंदरे मत्री नितेश राणे, जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, मनोज रावराणे, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस लखमराजे भोसले, युवा जिल्हाध्यक्ष संदीप मेस्त्री, महिला जिल्हाध्यक्ष श्वेता कोरगावकर, माजी नगराध्यक्ष समीर नलावडे, मंडल अध्यक्ष मिलिंद मेस्त्री, डॉ. मिलिंद कुलकर्णी आदी.




मुंबई – उत्तर मध्य मुंबई जिल्हाध्यक्ष वीरेंद्र म्हात्रे यांचा पदग्रहण कार्यक्रम– उपस्थिती– मुंबई अध्यक्ष व माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, आ. संजय उपाध्याक्ष, आ.पराग अळवणी, ज्येष्ठ नेते कृपाशंकर सिंह आदी.



उबाठा गटाचे अमरावती जिल्हाप्रमुख सुनील खराटे, शेतकरी सेनेचे प्रदेश समन्वयक अनिल लोहकपूरे यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण आदी.



काँग्रेस आदिवासी विभाग प्रदेश उपाध्यक्ष व इगतपुरीचे माजी सभापती गोपाळ लहांग, नाशिक जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य शकुंतला डगळ यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण आदी.



रामटेक- काँग्रेसचे माजी जिल्हा परिषद सदस्य दूधराम सव्वालाखे, रामटेक तालुक्यातील आजनी, नंदापुरी, चोखाडा, मांद्री, आसोली, घोटी, चिंचाडा, काचूरवाही, लोहडोंगरी, हमलापुरी, भांडारबोडी, सालेमेटा, हंसापुर, नगरधन, बोरी, खोबरावाटी या गावातील सरपंच, उपसरपंच यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी आ. सुधाकर कोहळे आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp













**प्रति,**

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com